दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३३६ I शनिवार १९ सप्टेंबर २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

# पाण्याच्या स्रोतांभोवती भूजल उपशाला लगाम!

## पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांपासून ५०० मीटर परिसरात विहिरींना मनाई; एक किलोमीटरपर्यंत भूजल उपशावर तात्पुरती बंदी

### पावसाने दडी मारल्याने शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय; टँकरपूर्वी नऊ उपाययोजनांना प्राधान्य

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सप्टेंबरचा पंधरवडा उलटूनही राज्यातील अनेक भागांत पुरेसा पाऊस न झाल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याचे संकट तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने भूजल उपशावर तात्पुरते निर्बंध घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर भूजल उपशाचा प्रतिकूल परिणाम होत असल्यास संबंधित विहिरींमधून पाणी उपसा काही कालावधीसाठी बंद करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक स्रोतांच्या ५०० मीटर परिसरात पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी विहिरी



खोदण्यास परवानगी देऊ नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून एक किलोमीटर अंतरातील विहिरींमधून होणाऱ्या भूजल उपशावर तात्पुरती बंदी घालण्याची कार्यवाही करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.कमी पावसामुळे लातूर जिल्ह्यात पाणीटंचाईची शक्यता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जलस्रोतांचे संरक्षण, पाण्याची गळती रोखणे आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर(पान ४ वर)

#### खरीप नुकसानीच्या अचूक नोंदीचे आदेश

कमी पावसाचा खरीप पिकांनाही मोठा फटका बसला आहे. पीक कापणी प्रयोगांच्या माध्यमातून नुकसानीच्या पारदर्शक आणि अचूक नोंदी ठेवण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याचा योग्य लाभ मिळण्यास मदत होणार आहे. संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठीही प्रशासनाने आगाऊ नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

#### टँकर हा शेवटचा पर्याय

पाणीटंचाई निवारणासाठीच्या एकूण दहा उपाय योजनांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याची उपाययोजना वगळता उर्वरित नऊ उपाययोजनांना प्रथम प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत. या उपाययोजना शक्य नसतील, अशाच ठिकाणी टँकर किंवा बैलगाडीच्या माध्यमातून पाणीपुरवठा करावा. तसेच टँकरवर जीपीएस यंत्रणा बसविण्याची अट समाविष्ट करण्याचे निर्देश परिपत्रकात देण्यात आले आहेत.

# शेतावरच उसाची रिकव्हरी तपासून दर ठरविणार : सुजय विखे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**ब्रिक्सोमीटरने तपासणी; ऊस कोणत्या कारखान्याला द्यायचा, याचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना**

**माळवाडगाव :** यंदाच्या गळीत हंगामात प्रत्येक शेतकऱ्याच्या उसाची रिकव्हरी शेतावरच तपासली जाणार असून, त्या रिकव्हरीच्या प्रमाणानुसार प्रवरा कारखाना उसाला दर देणार आहे. उसामध्ये साखरेचे प्रमाण किती आहे, हे तपासण्यासाठी ब्रिक्सोमीटरचा वापर केला जाणार असल्याची घोषणा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली. ऊस कोणत्या कारखान्याला द्यायचा, याचे पूर्ण स्वातंत्र्य शेतकऱ्यांना असून, त्यांच्यावर कोणताही दबाव आणता येणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कारेगाव येथे भाजपचे माजी तालुकाध्यक्ष दीपक पटारे यांच्या वस्तीवर डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ऊस उत्पादक शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील गावागावांतील हजारो ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले, आतापर्यंत या परिसरातील शेतकऱ्यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा सहकारी साखर कारखान्यास ऊस पुरविण्याची मानसिकता दाखविली आहे. यापूर्वी सर्वांना समान भाव मिळत होता. मात्र, यंदा ऊसातील साखरेचे प्रमाण तपासण्यासाठी कारखान्याच्या शेतकी विभागाला तपासणी किट देण्यात आले आहे. शेतावरच ब्रिक्सोमीटरद्वारे उसाची गोडी तपासली जाईल. त्यानुसार ऊसतोडीचे नियोजन करण्यात येईल.

रिकव्हरी कमी आढळलेल्या उसाची तोडणी काही दिवस पुढे ढकलली जाऊ शकते, असे सांगताना त्यांनी शेतकऱ्यांनी त्यासाठी तयारी ठेवावी, असे आवाहन केले. तसेच ऊस कोणत्याही कारखान्याला देण्याचा अधिकार शेतकऱ्यांना असल्याचे स्पष्ट करून, भविष्यात अडचणीत येण्याची शक्यता असलेल्या कारखान्याला ऊस देताना शेतकऱ्यांनी विचार करावा, असेही ते म्हणाले.

प्रवरा कारखान्यास ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांच्या सार्वजनिक तसेच वैयक्तिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली. आपण (पान ४ वर)

#### अशोक कारखान्याची निवडणूक लढविणार नाही

परिसरातील कार्यकर्ते आणि पत्रकार आपण काही घोषणा करणार म्हणून उत्सुक असतील; मात्र सहकाराचे नुकसान करण्यासाठी आपण कोणाशीही स्पर्धा करणार नसल्याचे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले. सहकार टिकला पाहिजे, ही भूमिका असल्याचे सांगत त्यांनी भविष्यात अशोक कारखान्याची निवडणूक लढविणार नसल्याचे जाहीर केले. ते म्हणाले, परिसरातील अनेक कार्यकर्ते कारखान्याची निवडणूक लढविण्याची विनंती करीत होते. मात्र, सभासदांनी कारखाना ज्यांच्या ताब्यात दिला आहे, त्यांना तो चालवू द्यावा. कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून मी निवडणूक लढविली असती तर त्याचे खापर आमच्यावर आले असते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लवकरच दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करणार



**दुष्काळसदृश भागात सरकार पूर्ण ताकदीने उभे राहणार**

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई/सातारा :** गणेशोत्सवानिमित्त आपल्या दरे या गावी आलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. काही भागांत पावसाने ओढ दिल्याने पिकांचे नुकसान झाले असून, अशा ठिकाणी सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभे राहील, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राज्यातील काही भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे नमूद करत सरकारने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

विदर्भ आणि विशेषतः मराठवाड्यात काही भागांत पावसाने ओढ दिल्याने उभी पिके करपल्याचे आणि शेतीचे नुकसान झाल्याचे शिंदे यांनी मान्य केले. धाराशिव जिल्ह्यातील परिस्थितीबाबत पालकमंत्री प्रताप सरनाईक, खासदार ओमराजे निंबाळकर आणि जिल्हाधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे चर्चा करून प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेतल्याचेही त्यांनी सांगितलेराज्यात कुठे अतिवृष्टी तर कुठे पावसाची कमतरता अशा दोन्ही परिस्थिती निर्माण होत आहेत. मात्र संकट कोणतेही असो, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, नुकसानीच्या आधारे शेतकऱ्यांना मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले

बळीराजा हा आपला अन्नदाता आहे. तो संकटात असताना सरकार त्याच्या पाठीशी ताकदीने उभे राहील, अशी भूमिका शिंदे यांनी मांडली. यापूर्वीही नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यात आला असून, यावेळीही सरकार मदतीत कोणतीही कसर ठेवणार नाही, असे त्यांनी सांगितले.दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या भागांचा पालकमंत्री दौरा करत असून, आपणही संबंधित भागांना भेट देणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. त्यामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेण्याची सरकारची तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विरोधकांकडून होणाऱ्या टीकेला प्रत्युत्तर देण्यापेक्षा सरकारने केलेल्या कामांची आकडेवारी जनतेसमोर ठेवण्याची भूमिका असल्याचेही शिंदे यांनी नमूद केले. टीका करणाऱ्यांना टीका करू द्या; महायुती सरकार शेतकऱ्यांच्या मागे (पान ४ वर)

# आता 'अशोक'ची निवडणूक नाही...

## सुकाणू समिती कारखाना चालवणार?

### ३८०० दर देण्याची प्रताप भोसले यांची पत्रकार परिषदेत घोषणा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** अशोक बँकेची आर्थिक पडझड झाल्यानंतर अशोक कारखान्याच्या कारभारावरही संशय व्यक्त केला जात आहे. कारखान्याची आर्थिक स्थिती आणि आगामी गळीत हंगामाच्या स्थितीबाबत सभासदांच्या मनात संभ्रम आहे. अशातच साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त प्रताप भोसले यांनी अशोक कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत सभासदांची सुकाणू समिती निर्माण करून त्या समितीमार्फत कारखान्याचा कारभार



चालवला जाणार असून यंदा असल्याची घोषणा केली.

अशोक कारखान्याची आर्थिक स्थिती गंभीर असली तरी कारखाना चालवण्यास अडचण येणार नाही. कारखान्यात चालवणाऱ्या व्यक्तीचे सरकारी संबंध महत्त्वाचे असतात. त्यादृष्टीने आपण यापुढे प्रयत्न करणार असल्याचे प्रताप भोसले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी बाळासाहेब उंडे, शेतकरी संघटनेचे सुरेश ताके उपस्थित होते.

अशोक कारखाना ही श्रीरामपूर तालुक्याची काम देणे आहे. ती टिकावी या हेतूने प्रयत्न करावा अशी सभासदांची मागणी आहे. मी (पान ४ वर)

#### तर अशोक बँकेची ही स्थिती झालीच नसती...

अशोक बँकेची आर्थिक स्थिती ढासळत असल्याची माहिती मिळाल्यानंतर आपण मुरकुटे यांना मदत करण्यासाठी संपर्क केला होता. नाबार्ड आणि इतर राष्ट्रीय स्तरावरच्या महत्त्वाच्या संस्थांबरोबर आपण काम करत असल्याने आपल्या अनुभवाचा फायदा संस्थेला झाला असता. मात्र मुरकुटे यांनी मदत नाकारली. मदत करण्यामागे माझा काही स्वार्थ नव्हता. उलट मुरकुटे यांनी श्रीरामपूरच्या सभासदांचे पैसे नगर, पुणे आणि मुंबईच्या लोकांना वाटून सभासदांची दिशाभूल केली आहे. शिवाय कर्जदाराकडून तब्बल १५ टक्के त्यांनी कमिशन घेतल्याचा आरोपही प्रताप भोसले यांनी पत्रकार परिषदेत केला.

# निवृत्त कर्नलचीच बांधकाम व्यावसायिकांकडून फसवणूक?

- फ्लॅटचे स्वप्न दाखवून १३.९२ लाख घेतल्याचा आरोप
- भिंगार कॅम्प पोलिसांत चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दरेवाडी परिसरातील प्रस्तावित गृहप्रकल्पात फ्लॅट बुक करण्यासाठी निवृत्त कर्नलने दिलेली तब्बल १३ लाख ९२ हजार ६२५ रुपयांची रक्कम अनेक वर्षे उलटूनही परत न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. फ्लॅटचा ताबाही मिळाला नसल्याने निवृत्त कर्नलने दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी एल.एस.व्ही.एस. डेव्हलपर्सशी संबंधित चौघांविरुद्ध आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणामुळे शहरातील व्यावसायिक वर्तुळात चर्चेत असलेल्या संबंधित डेव्हलपर्सच्या व्यवहारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सतीश वामन गिरी, दिलीप प्रेमराज चंडक, सुशिल हनुमानदास सारडा आणि सुयश रविंद्र लुणावत अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. याप्रकरणी भोम प्रकाश दुबे (वय ६५, रा. सारसनगर, अहिल्यानगर) यांनी १८ सप्टेंबर रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या (पान ४ वर)



# मातीचा गणपती अन् एरंडाच्या बियांचा प्रसाद; १३ चिमुकल्यांना विषबाधा

## गणेशोत्सवाच्या आनंदावर संकट; आ. बोरनारेंकडून बालकांची विचारपूस

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** गणेशोत्सवाच्या उत्साहात मातीचा गणपती तयार करून त्याची आरती करणाऱ्या चिमुकल्यांनी प्रसाद म्हणून एरंडाच्या बिया खाल्ल्या आणि काही वेळातच त्यांची प्रकृती बिघडली. तब्बल १३ मुलांना विषबाधा झाल्याने कापूसवाडगाव परिसरात खळबळ उडाली. मुलांची प्रकृती अचानक खालावल्याने घाबरलेल्या पालकांनी त्यांना रात्री उशिरापर्यंत वैजापूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

गणेशोत्सवाची सुट्टी असल्याने १७ सप्टेंबर रोजी कापूसवाडगावातील काही मुले परिसरात एकत्र आली होती. त्यांनी स्वतःच्या हाताने मातीचा गणपती तयार करून त्याची स्थापना केली. गणपतीची आरती झाल्यानंतर प्रसादासाठी काही



उपलब्ध नसल्याने परिसरातील एरंडाच्या बिया त्यांनी प्रसाद समजून खाल्ल्या. बालमनाच्या या निरागस कृतीनंतर काही वेळातच मुलांना अस्वस्थ वाटू लागले.

काही मुलांची प्रकृती अधिक खालावल्याने पालकांनी तातडीने त्यांना रुग्णालयात नेले. रात्री उशिरापर्यंत विषबाधाग्रस्त मुलांना उपचारासाठी दाखल करण्यात येत होते. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांमध्येही चिंता व्यक्त करण्यात आली.

या घटनेत रोहिणी आव्हाड (१४), जयश्री आव्हाड (१८), खुशी आव्हाड (११), अंजली पवार (११), राधिका आव्हाड (१७), कैवल्या नांगरे (३), सुप्रिया त्रिभुवन (१४), साहिल आव्हाड (१८), कल्याणी आव्हाड (११), प्राची त्रिभुवन (११), आयुष त्रिभुवन (५), आर्यन त्रिभुवन (११) आणि अनुप त्रिभुवन (९) यांना विषबाधा झाल्याचे सांगण्यात आले.गुरुवारी सकाळी आमदार प्रा. रमेश बोरनारे यांनी वैजापूर ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन उपचार घेत असलेल्या बालकांची विचारपूस केली. त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून मुलांना देण्यात येणाऱ्या उपचारांची माहिती घेतली तसेच त्यांच्या प्रकृतीचा आढावा घेतला. मुलांना लवकर आराम मिळावा आणि त्यांना योग्य उपचार मिळावेत, यासाठी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.गणेशोत्सवाच्या आनंदात घडलेल्या या घटनेने पालकांना मोठा धक्का बसला आहे. लहान मुलांनी अनोळखी बिया, फळे अथवा वनस्पतींचे भाग खाद्य समजून खाऊ नयेत, याबाबत पालकांनी विशेष काळजी घेण्याची गरज या घटनेतून अधोरेखित झाली आहे.

#### निरागस खेळ अन् अचानक संकट

कापूसवाडगावातील चिमुकल्यांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने स्वतः मातीचा गणपती तयार केला. आरतीनंतर प्रसाद म्हणून एरंडाच्या बिया खाल्ल्यानंतर काही वेळातच मुलांना त्रास जाणवू लागला. आनंदाच्या वातावरणाचे रूपांतर काही क्षणांतच पालकांच्या चिंतेत झाले.

#### रात्रीची पालकांची धावपळ

मुलांची प्रकृती बिघडल्याचे लक्षात येताच पालकांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. रात्री उशिरापर्यंत विषबाधाग्रस्त बालकांना उपचारासाठी आणले जात होते. वैजापूर ग्रामीण रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले.

#### आमदारांकडून रुग्णालयात पाहणी

आमदार प्रा. रमेश बोरनारे यांनी गुरुवारी सकाळी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन विषबाधाग्रस्त बालकांची विचारपूस केली. डॉक्टरांकडून उपचारांची माहिती घेत त्यांनी मुलांच्या प्रकृतीचा आढावा घेतला. आवश्यक उपचार व काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना दिल्या.

#### विषबाधाग्रस्त बालके

रोहिणी आव्हाड, जयश्री आव्हाड, खुशी आव्हाड, अंजली पवार, राधिका आव्हाड, कैवल्या नांगरे, सुप्रिया त्रिभुवन, साहिल आव्हाड, कल्याणी आव्हाड, प्राची त्रिभुवन, आयुष त्रिभुवन, आर्यन त्रिभुवन आणि अनुप त्रिभुवन यांना विषबाधा झाल्याचे सांगण्यात आले.

#### पालकांनी घ्यावी काळजी

लहान मुले खेळताना परिसरातील बिया, फळे किंवा वनस्पतींचे भाग सहज तोंडात घालू शकतात. त्यामुळे अशा वस्तू खाद्य आहेत की नाहीत, याची खात्री नसल्यास मुलांना त्या खाण्यापासून रोखणे आवश्यक आहे. संशयास्पद वस्तूचे सेवन झाल्यास विलंब न करता वैद्यकीय उपचार घेणे गरजेचे आहे.

# दुष्काळाच्या झळा तीव्र होण्याआधी जागे व्हा!

**विशेष संपादकीय** — करण नवले (संपादक)

**पा**ऊस पडला नाही म्हणूनच दुष्काळ पडतो, असे नाही. पाऊस वेळेवर, पुरेसा आणि पिकांच्या गरजेच्या काळात पडला नाही, तरी दुष्काळाची चाहूल लागते. यंदा महाराष्ट्रातील अनेक भागांत नेमके हेच चित्र दिसत आहे. पावसाने सुरुवातीला आशा निर्माण केली; मात्र त्यानंतर पडलेल्या मोठ्या खंडाने खरीप पिकांची अवस्था बिकट केली आहे. विशेषतः अहिल्यानगर, मराठवाडा आणि महाराष्ट्राच्या बहुतांश पठार भागात दुष्काळसदृश परिस्थिती गंभीर होताना दिसत आहे. सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी यांसह विविध खरीप पिके पाण्याअभावी संकटात सापडली आहेत. काही भागांत उभ्या पिकांची वाढ खुंटली असून, अनेक ठिकाणी उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्याने पेरणी, खते, औषधे, मशागत यावर केलेला खर्च डोळ्यांदेखत वाया जाण्याची वेळ आली आहे. त्यातच कर्जाचा भार आणि पुढील हंगामाची चिंता शेतकऱ्याला सतावत आहे.

दुष्काळाचे संकट केवळ शेतापुरते मर्यादित नसते. पिके हातातून गेली की जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो. पाणीसाठे कमी झाले की पिण्याच्या पाण्याची चिंता वाढते. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचा थेट परिणाम होतो. त्यामुळे दुष्काळाची अधिकृत घोषणा झाली आहे की नाही, यापेक्षा दुष्काळाचे परिणाम प्रत्यक्षात सुरू झाले आहेत का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

राज्य सरकारने परिस्थितीची दखल घेत पाणी उपशावर निर्बंध, पिकांच्या नुकसानीचे पंचनामे आणि अन्य उपाययोजना सुरू केल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी दौऱ्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समित्यांकडूनही परिस्थितीचा आढावा घेतला जाणार आहे. या उपाययोजना स्वागतार्ह असल्या, तरी वेळ हा या संकटातील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे.

शासकीय निकष, पंचनामे आणि अहवाल यांना निश्चितच महत्त्व आहे; मात्र शेतातील वास्तव त्याहून मोठे आहे. पिकांची अवस्था, भूजलपातळी, धरणांतील पाणीसाठा, चाऱ्याची उपलब्धता आणि पावसातील खंड यांचा एकत्रित विचार करून शासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे पर्जन्यमान, पीकस्थिती आणि जलसाठ्याचे अचूक चित्र उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे मदत आणि उपाययोजनांसाठी केवळ कागदी प्रक्रियेवर अवलंबून राहणे योग्य ठरणार नाही. विशेषतः अहिल्यानगर आणि मराठवाड्यातील अनेक भागांत पाणी उपशावर घातलेले निर्बंध हे केवळ आदेशापुरते न राहता त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. भूजलाचा बेसुमार उपसा थांबवतानाच पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. चारा उपलब्धतेचा आढावा घेऊन आवश्यक तेथे चारा डेपो, पाणीपुरवठा आणि जनावरांसाठी तातडीच्या उपाययोजना सुरू कराव्यात. पिकांचे पंचनामे वेगाने पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळाली पाहिजे. मदतीचे निकष ठरविताना प्रत्यक्ष नुकसानीचा विचार व्हावा. शासनाने संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी ठोसपणे उभे राहणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आगामी रब्बी हंगामासाठी उपलब्ध पाण्याचे नियोजन, पिण्याच्या पाण्याचा आराखडा आणि चारा व्यवस्थापन आतापासूनच करणे गरजेचे आहे. महाराष्ट्राने दुष्काळाशी लढण्याचा मोठा अनुभव घेतला आहे. १९७२च्या दुष्काळाने रोजगार हमी, जलसंधारण आणि ग्रामीण विकासाच्या उपाययोजनांना नवी दिशा दिली. त्या अनुभवातून एक गोष्ट स्पष्ट होते दुष्काळावर मात करण्यासाठी संकटाची तीव्रता वाढण्याची वाट पाहण्याची गरज नसते; संकटाची चाहूल लागताच कामाला लागावे लागते. आजची परिस्थितीही शासनाला हाच संदेश देत आहे. उद्या टँकर सुरू करावे लागल्यानंतर, चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर किंवा पिके पूर्णपणे हातातून गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा आजच प्रतिबंधात्मक पावले उचलणे अधिक शहाणपणाचे आहे.

दुष्काळ जाहीर करण्याच्या तारखेपेक्षा दुष्काळाची चाहूल महत्त्वाची आहे. पंचनाम्याच्या कागदापेक्षा शेतकऱ्याच्या शेतातील वास्तव महत्त्वाचे आहे. त्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची वाट न पाहता शासनाने तातडीने सर्वंकष उपाययोजना राबवाव्यात. दुष्काळाच्या झळा अधिक तीव्र होण्याआधी सरकारने जागे व्हावे, हीच आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

# सौ. सुशीलामाई काळे विद्यालयाच्या दोन वर्गखोल्यांचे लोकार्पण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : रयत शिक्षण संस्थेच्या शाळांच्या अडचणी सोडविण्यासाठी माजी खासदार स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी साखर कारखान्याच्या माध्यमातून भक्कम पाठबळ दिले. शाळांसाठी जागा, वर्गखोल्या तसेच विकासासाठी निधी उपलब्ध करून देत त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ दिले. रयत शिक्षण संस्थेच्या शाळांना ज्या ज्या वेळी अडचणी आल्या त्या अडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे खेड्यापाड्यात शाळा–महाविद्यालय उभे राहिले आणि ग्रामीण भागात ज्ञानाची गंगा आली. रयतच्या शाळांना मा.खा.स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी भक्कम आधार देत खेड्यापाड्यात रयत शिक्षण संस्थेचे शाळा महाविद्यालय उभारण्यात मोलाचे योगदान दिले असे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले.

कोपरगाव तालुक्यातील भोजडे येथील सौ. सुशीलामाई शंकरराव काळे माध्यमिक विद्यालयात कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या दोन वर्गखोल्यांचे लोकार्पण व दोन वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीच्या कामाचे भूमिपूजन आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, भोजडे येथे पूर्वी सातवीपर्यंतच शिक्षणाची सुविधा होती. माध्यमिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना दहेगाव किंवा वारी येथे जावे लागत होते. विशेषतः मुलींच्या शिक्षणाची अडचण लक्षात घेऊन स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी १९९० मध्ये या विद्यालयाची स्थापना केली. शाळेसाठी ८१ आर जागा उपलब्ध करून देत चार वर्गखोल्या बांधून देण्याबरोबरच सौ. सुशीलामाई काळे यांच्या निधनानंतर त्यांच्या नावे असलेल्या ८ लाख ३२ हजार रुपयांच्या बचत ठेवीची रक्कमही त्यांनी शाळेच्या विकासासाठी दिली. रयतच्या शाळांच्या अडचणी घेऊन येणाऱ्या प्रत्येकाला स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी नेहमी मदतीचा हात दिला. रयतच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, हा डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा विचार त्यांच्या अनमोल योगदानातून व कार्यातून प्रत्यक्षात उतरला. त्यांच्या शैक्षणिक सेवेचा हा वारसा माजी आमदार अशोकराव काळे यांनी समर्थपणे पुढे घेवून जात रयतच्या शाळांना आवश्यक ते सहकार्य व मदत केली. काळे परीवाराचा सदस्य या नात्याने ती परंपरा मी पण जपली असून यापुढील काळातही रयत शिक्षण संस्थेच्या शाळा–महाविद्यालयांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याची भूमिका कायम राहील, असे आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य कारभारी आगवन, भाऊसाहेब सिनगर, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहम,दिलीपराव बोरनारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गोवर्धन परजणे, जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, माजी पं. स. सदस्य मधुकर टेके, गौतम बँकेचे संचालक विजयराव रक्ताटे, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक अनिल वल्टे, विक्रम सिनगर, जनरल बॉडी सदस्य नानासाहेब मते, शिवाजीराव ठाकरे, स्थानिक सल्लागार समिती सदस्य प्रकाश शिंदे, उद्धव बोरावके, अशोक काजळे, लक्ष्मण चौधरी, भोजडेचे सरपंच सुधाकर वादे, दहेगाव बोलकाचे सरपंच भरत चौधरी, कान्हेगावचे सरपंच गणेश सोनवणे, माजी उपसरपंच दत्तात्रय सिनगर, मुख्याध्यापक भास्कर काजळे, शाळा व्यवस्थापन कमिटी सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, पालक, शिक्षक, विद्यार्थी व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुरी शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी पंडित हजारे

## गुरुमाऊली सदिच्छा मंडळाच्या अध्यक्षपदी संदीप साकुरे

### त्रैवार्षिक अधिवेशन व गौरव सोहळा उत्साहात; गुणवंत विद्यार्थी, आदर्श शिक्षक व पदोन्नत शिक्षकांचा सन्मान



निवृत्ती धुमाळ
अध्यक्ष उच्चधिकार संघ



संदीप साकुरे
अध्यक्ष गुरुमाऊली-सदिच्छा मंडळ



सुनिता ढोरमले
अध्यक्ष महिला आघाडी



पंडित हजारे
अध्यक्ष शिक्षक संघ



मनोज देशमुख
अध्यक्ष सांस्कृतिक संघ



सोन्याबापु आंबेकर
अध्यक्ष पदवीधर संघ



पाटीलबा गडधे
अध्यक्ष तंत्रस्नेही संघ



संजय शेळके अध्यक्ष
उच्चअधिकार मंडळ



बाळकृष्ण देवरे
अध्यक्ष मुख्याध्यापक संघ



सुरेखा सांगळे
अध्यक्ष महिलाआघाडी नगरपालिका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुका शिक्षक संघ तथा गुरुमाऊली–सदिच्छा मंडळाचे त्रैवार्षिक अधिवेशन व गौरव सोहळा शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला. यावेळी विविध संघटनांच्या नूतन कार्यकारिण्यांची निवड जाहीर करण्यात आली. राहुरी तालुका शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी पंडित हजारे, तर गुरुमाऊली सदिच्छा मंडळाच्या अध्यक्षपदी संदीप साकुरे यांची निवड करण्यात आली.अधिवेशनात शिष्यवृत्ती, नवोदय, उच्च शिक्षणासाठी निवड, विविध क्षेत्रांत यश संपादन करणारे विद्यार्थी, नोकरीत निवड झालेले तसेच पदोन्नती मिळविलेले शिक्षक आणि आदर्श शिक्षकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुवर्णा कचरे, अनिल कल्हापुरे, सुनील लोंढे तसेच सामाजिक स्तरावरील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त सारिका भिंगारदिवे यांचा विशेष गौरव करण्यात आला.

नवनियुक्त केंद्रप्रमुख अमोल मांगुडे, राहुल खराडे, रामेश्वर तेलोरे, नितीन पवार, तसेच नवनियुक्त मुख्याध्यापक बाळकृष्ण देवरे, सुनील लोंढे, अनिल कल्हापुरे, मच्छिंद्र गोफणे यांचाही सन्मान करण्यात आला. नवनियुक्त विषय शिक्षक मनोज भापकर, संतोष गुलदगड, सगळगिळे मॅडम यांना यावेळी गौरविण्यात आले. कार्यक्रमात संघ जिल्हाध्यक्ष बबनदादा गाडेकर, मंडळ जिल्हाध्यक्ष संतोष दुसुंगे, शिक्षक नेते साहेबराव अनाप, विकास मंडळ अध्यक्ष प्रल्हाद भालेकर, जुनी पेन्शन संघटनेच्या जिल्हाध्यक्षा वाकचौरे, शिक्षक बँकेच्या अध्यक्षा सरस्वती घुले, उपाध्यक्ष शिवाजी कराड आदींनी शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटनात्मक एकजूट महत्त्वाची असल्याचे सांगितले.

शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांनी शिक्षक बँकेच्या कारभाराचे कौतुक करत राहुरी तालुक्याची भक्कम साथ असल्याने संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळत असल्याचे नमूद केले. यशस्वी विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे त्यांनी अभिनंदन केले. माजी उपसभापती रवींद्र आढाव यांनी शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळाची विधान परिषद सदस्य प्राजक्त तनपुरे यांच्यासोबत भेट घडवून आणून शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनीही शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या स्वीकृत संचालकपदी विजय नरवडे व राजेंद्र कुदनर यांची निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. कार्यक्रमात उत्कृष्ट पार्श्वगायक संदीप शेळके, विष्णू खामकर, मनोज देशमुख, गायकवाड मॅडम यांच्या गीतांचा कार्यक्रम झाला.

शिक्षक संघ, गुरुमाऊली सदिच्छा मंडळ, उच्च अधिकार समिती, तंत्रस्नेही मंडळ, सांस्कृतिक मंडळ, मुख्याध्यापक संघ, पदवीधर संघ, महिला आघाडी आदींच्या नूतन कार्यकारिण्या जाहीर करण्यात आल्या. कार्यक्रमास राहुरी तालुक्यातील शिक्षक–शिक्षिका, पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन विठ्ठलराव काकडे व राहुल खराडे यांनी केले. स्वागत गोरक्षनाथ विटनोर यांनी केले. प्रास्ताविक निवृत्ती धुमाळ यांनी केले, तर आभार राजेंद्र मरभळ यांनी मानले.

# ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या दालनात २२ तारखेला उपोषण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : कारेगाव ग्रामपंचायतीतील एकात्मिक ग्रामविकास योजनेअंतर्गत सन १९९४–९५ मध्ये बांधण्यात आलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील मूळ शासकीय गाळे भुईसपाट करून आवश्यक शासकीय परवानगी न घेता नवीन बांधकाम केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मागील सुमारे आठ महिन्यांपासून सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे ग्रा. सदस्य सुनील पाटारे यांनी म्हटले आहे.

या प्रकरणी पटारे यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच संबंधित अन्य अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी तक्रारी व निवेदने दिली आहेत. वरिष्ठ कार्यालयांकडून संबंधित यंत्रणांना पत्रव्यवहार व कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्याचे कागदपत्रांमधून दिसून येते. तसेच माहिती अधिकाराच्या माध्यमातूनही या प्रकरणातील कागदपत्रे व कार्यवाहीची माहिती घेण्यात आली आहे.

मूळ शासकीय गाळे पाडण्यास परवानगी होती का, नवीन बांधकामासाठी आवश्यक प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली होती का, तसेच गाळ्यांचे वाटप व हस्तांतरण नियमानुसार झाले आहे का, याची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पटारे यांनी केली आहे.

आठ महिन्यांच्या पाठपुराव्यानंतरही ठोस कार्यवाही न झाल्याने पटारे यांनी आता २२ सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या दालनात शांततापूर्ण उपोषण करण्याचे जाहीर केले आहे. या उपोषणाबाबत पोलीस यंत्रणेला आवश्यक पूर्वसूचना देण्यात आलेली आहे, असे पटारे यांनी सांगितले.

या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी व कार्यवाहीचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# नेवासाफाटा ते नेवासा रस्त्यावर गतिरोधक बसवा : मुन्ना चक्रनारायण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा:** दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ वाढत चालल्याने अपघाताचे प्रमाण ही वाढत असल्याने नेवासाफाटा ते नेवासा या मुख्य रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात यावे अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेवासा तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून याबाबत कार्यवाही न झाल्यास या भागातील शालेय विद्यार्थी व रहिवाशांना बरोबर घेऊन रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



नेवासा ते नेवासाफाटा या मुख्य रस्त्यावर गांधीनगर, गायत्रीनगर,नामदेवनगर,श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय व त्यांच्या शेजारीच ज्ञानदीप इंग्लिश स्कूल, अहिल्यानगर, संभाजीनगर ही उपनगरे ही येतात या उपनगरामधील रहिवाशांना तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या नेवासा
शहरात व तेथील लोकांना नेवासाफाटा येथे सतत कामानिमित्त यावे लागते मात्र या भागात स्पीड बेकर्स नसल्याने वाहने भरधाव वेगाने धावतात त्यामुळे अनेक प्रकारचे अपघात या रस्त्यावर घडलेले आहे.

या रस्त्यावर असलेल्या श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात दररोज हजारो विदयार्थी तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून येथे शिक्षण घेण्यासाठी येत असतात,महाविद्यालयात सकाळच्या सत्रातील कॉलेज सुटतांना व दुपारच्या सत्रातील ज्युनियर कॉलेज भरतांना विदयार्थ्यांची खुपच गर्दी होत असते त्याच बरोबर गायत्रीनगर प्रवेशद्वाराजवळ मुलींचे शासकीय वसतिगृह व येथील भागातील रहिवासी हे ये जा करत असतात येथे ही गतिरोधक बसविणे गरजेचे आहे असे निदर्शनास आले आहे.

परिस्थतीचे गांभीर्य लक्षात घेऊन महाविदयालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर तसेच उपनगरातील रस्त्यावर लवकरात लवकर योग्य आकाराचे गतिरोधक बसवावेत तसेच या रस्त्यावर वाहतुक नियमांचे फलक बसविण्यांत यावेत सदरचे काम आठ दिवसाच्या आत न झाल्यास या परिसरातील नागरिक व शालेय विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन नेवासा कॉलेज रस्त्यावर रास्तारोको आंदोलन केले जाईल असा ईशारा शिवसेना तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण यांनी निवेदनात दिला आहे

# साखरेची दरवाढ सर्वसाधारण सभेच्या मंजुरीविना; मते पाटील यांचा आक्षेप



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : ऊस उत्पादक सभासदांना वाटप करण्यात येणाऱ्या साखरेच्या दरात वाढ करताना सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे कायदेशीरदृष्ट्या आवश्यक असताना ज्ञानेश्वर साखर कारखान्याने केलेली साखरेची दरवाढ बेकायदेशीर व मनमानी असल्याचा आरोप ऊस उत्पादक शेतकरी तथा काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष वसंतराव मते पाटील यांनी केला आहे. ही दरवाढ त्वरित थांबवून सभासदांना जुन्या दराने साखर देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी कारखान्याच्या कार्यकारी संचालकांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सभासदांना मूळ दराने साखर दिल्याने कारखान्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारखान्यात बचतीचे अनेक मार्ग उपलब्ध असताना महागाईच्या काळात ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर साखरेच्या दरवाढीचा अतिरिक्त भार टाकू नये. साखरेच्या दरवाढीप्रमाणेच ऊस दरवाढीसाठीही तत्परता दाखवावी आणि सभासदांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावेत. सन २०२५–२६ हंगामातील उसाला एफआरपीप्रमाणे दर देण्यात आला असून, सभासदांना दिल्या जाणाऱ्या साखरेच्या दरात प्रतिकिलो दहा रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे प्रथम या हंगामातील उसासाठी प्रतिटन ५०० रुपये द्वितीय हप्ता द्यावा, त्यानंतरच साखरेच्या दरात वाढ करावी, अशी मागणी मते पाटील यांनी केली आहे.मयत सभासदांचे शेअर्स त्यांच्या वारसांच्या नावावर तातडीने हस्तांतरित करावेत. तसेच ज्येष्ठ सभासदांच्या वारसांनी अर्ज केल्यास तत्काळ कार्यवाही करावी. निवेदनातील मागण्या व दोन मुद्द्यांबाबत आठ दिवसांत खुलासा करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# प्रशासनाच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद; नारायणपूरमध्ये विशेष स्वच्छता मोहीम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर:** तालुक्यातील नारायणपूर स्वच्छ आणि सुंदरतेसाठी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत प्रशासन, ग्रामपंचायत, शैक्षणिक क्षेत्र, आशा व अंगणवाडी कार्यकर्त्या तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत गावातील विविध गल्ली–बोळ आणि इदगाह परिसराची स्वच्छता करण्यात आली.

या विशेष मोहिमेचा उद्देश केवळ कचरा हटविणे एवढाच नसून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता कायम राखणे, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि सामूहिक सहभागातून गाव स्वच्छ ठेवण्याचा संदेश देणे हा होता. स्वच्छ परिसरामुळे नागरिकांना चांगले आणि आरोग्यदायी वातावरण मिळण्यास मदत होते. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता ही नियमितपणे जपणे आवश्यक असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

या विशेष स्वच्छता मोहिमेस राकेश साळुंखे, शिक्षणाधिकारी (निरंतर), जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर; सुहास वाघचौरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती गंगापूर; अशोक घोडके, प्रशासक, ग्रामपंचायत नारायणपूर बु. तथा विस्तार अधिकारी पंचायत; स्वप्नील घरमोडे, ग्रामपंचायत अधिकारी; तसेच माजी सरपंच नाशेर पटेल, यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रदीप पाटील प्रभारी मुख्याध्यापक, सहशिक्षक अजीम पठाण व गोकुळ बांगर, माजी ग्रामपंचायत सदस्य दिलीप खरात, सामाजिक कार्यकर्ते सिराज शेख, राजू शेख असलम शेख, अशा वर्कर दिव्या वाहूळ ,शबाना शेख,अंगणवाडी सेविका सुवर्णा वाहूळ, सविता धोत्रे व इर्षाद शेख, मदतनीस कार्यकर्त्या चंद्रकला जमधडे, उषा रावसाहेब जमधडे व शितल जमधडे, यांनी स्वच्छता मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग घेतला.

# पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सावित्रीबाई फुले विद्यालयाचे लोकनृत्य जिल्ह्यात प्रथम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प योजनेंतर्गत भूमिका अभिनय व लोकनृत्य जिल्हास्तरीय स्पर्धेचे नुकतेच चंदनापुरी, ता. संगमनेर येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध खाजगी अनुदानित, शासकीय व आश्रमशाळांनी सहभाग नोंदविला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी लोकनृत्य प्रकारात अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यालयाच्या लोकनृत्य संघाची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. लोकनृत्य स्पर्धेसाठी विविध सामाजिक विषय देण्यात आले होते. विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी ‘पर्यावरण संवर्धन’ हा विषय निवडून प्रभावी व आकर्षक




**जिल्हास्तरीय लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावलेल्या सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षिका.**

लोकनृत्य सादर केले. नृत्याच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, पाणी बचत, प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. आशयपूर्ण मांडणी, प्रभावी सादरीकरण आणि लोककलेचा सुंदर आविष्कार यामुळे विद्यालयाच्या संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. या यशासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे व पर्यवेक्षक मनोज बावा , प्रा. जितेंद्र मेटकर यांचे प्रोत्साहन व सहकार्य लाभले. लोकनृत्य स्पर्धेत राजेश्वरी जाधव, प्रज्ञा साळवे, जास्मिन पठाण, प्रांजल बोर्डे व अक्षदा ओहोळ या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. त्यांना अनघा सासवडकर, वैजयंती बुऱ्हाडे, योगिता कुताळ व ऋतुजा चव्हाण या मार्गदर्शक शिक्षिकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. महानंद माने यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू तथा अध्यक्ष डॉ. विलास खर्चे, सभापती डॉ. साताप्पा खरबडे व खजिनदार महेश घाडगे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांतील लौकिकात आणखी भर पडली आहे.

# खेमनर वस्ती व सय्यद वस्ती रस्त्याचा प्रश्न

## आ. काळेंनी मार्गी लावला : सिकंदर इनामदार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी-** सोयेगाव बंधाऱ्यातून पोहेगावच्या दिशेने वाहणाऱ्या ओढ्यामुळे खेमनर वस्ती व सय्यद वस्ती येथील नागरिकांना दळणवळणाच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. ओढ्याला पाणी आल्यावर नागरिकांना पाण्यातूनच ये–जा करावी लागत असल्याने विद्यार्थी, शेतकरी तसेच ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत होती. खेमनर वस्ती व सय्यद वस्तीच्या नागरिकांना येणाऱ्या अडचणीची दखल घेऊन आमदार आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे अधिकारी अमित चोळके यांना ओढ्यात सिमेंट पाईप टाकून रस्ता तयार करून देण्याच्या सुचना दिल्या असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते सिकंदर इनामदार यांनी दिली आहे.

सोयेगाव बंधाऱ्यातून पोहेगावकडे येणाऱ्या ओढ्याला पाणी आल्यावर येथील नागरिक, शेतकरी आणि शालेय विद्यार्थ्यांना पाण्यातूनच ये–जा करावी लागत होती. त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांचे मोठे हाल होत होते. शेतकऱ्यांना शेतमालाची ने–आण करण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. या गंभीर समस्येची दाखल घेऊन आ. आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या अधिकाऱ्यांना या ओढ्यावर दोन सिमेंट पाईप टाकून आवश्यक ते सीडी वर्क व रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आ. आशुतोष काळेंच्या सूचनेनंतर अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष जागेची पाहणी करून प्रत्यक्ष कामाला त्वरित सुरुवात करण्याचे आश्वासन दिले आहे. खेमनर वस्ती व सय्यद वस्तीचा कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न सुटणार असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसर असून नागरिकांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# पंतप्रधान मोदींच्या निर्णय प्रक्रियेतून शेवटच्या घटकाला संधी : ना. विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा उपक्रमांतर्गत पद्मश्री डॉ विखे पाटील फौंडेशन आणि दिव्यांग विभाग बांधवांना विविध साधन साहीत्यांचे वितरण करून आशीवार्दाचा सेवा दिप प्रज्वलित केला.जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत जेष्ठ नागरीकांना साहीत्याचे वितरण करण्यात आले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस तसचे त्यांच्या सार्वजनिक वाटचालीला २५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल संपूर्ण देशात सेवा उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.अहील्यानगर येथे जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनात आणि भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन आणि दिव्यांग विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींना साधन साहीत्याचे वितरण करण्यात आले.

यांप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग उपमहापौर धनंजय जाधव विनायक देशमुख जेष्ठ नेते वसंतराव कापरे,नगरसेवक निखिल वारे डॉ विखे पाटील फौंडेशनचे डॉ अभिजीत दिवटे डॉ पांडूरंग गायकवाड यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. समाजातील दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी आणि त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.या कार्यक्रमात दिव्यांग लाभार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार साधन साहीत्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी मंत्री विखे पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातील संपूर्ण वाटचाल जनतेसाठी समर्पित केली.सुशासन गरीब कल्याण आणि राष्ट्र निर्माण या भूमिकेतून सबका साथ सबका विकास आणि सबका कल्याण या विचाराने देशातील प्रत्येक नागरीकाला योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार काम करीत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे तर संधी, सुविधा आणि स्वावलंबनासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी करीता पद्मश्री डॉ विखे पाटील फौंडेशनने नेहमीच पुढाकार घेतल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन संपूर्ण महीनाभर करण्यात येणार असल्याचे विखे पाटील म्हणाले.

द•ख•ल

## जि. प. शाळा शेणवडगावचा हायटेक प्रवास



**राहुरी** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची जोड आणि विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेणवडगाव येथे संगणक कक्ष आणि विज्ञान प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. या नव्या सुविधेमुळे आता शेणवडगावच्या विद्यार्थ्यांचा शिक्षणप्रवास अधिक आधुनिक आणि कृतीयुक्त होणार आहे. केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता प्रत्यक्षात संगणकावर उमटणारी बोटे आणि विज्ञान प्रयोगांतून उलगडणारे निसर्गाचे गूढ अनुभवण्याची संधी आता विद्यार्थ्यांना मिळणार आहे. नुकत्याच आयोजित उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः संगणक प्रात्यक्षिके आणि छोटेखानी विज्ञान प्रयोग करून दाखवत आपल्यातील जिज्ञासू वृत्तीचे दर्शन घडवले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस आणि बँक पासबुकचेही वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र शिंदे यांनी सांगितले की, शाळेत केवळ संगणक व विज्ञानच नव्हे, तर बालसंस्कार शिबिर, परिसर भेटी, लघुउद्योग भेटी, महिला मेळावे आणि विद्यार्थ्यांची 'बचत बँक' यांसारख्या विविध उपक्रमांतून मुलांना कृतीतून व अनुभवातून शिक्षण दिले जात आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपाली पुराणिक यांनी केले, तर आभार गिरीधर जाधव यांनी मानले.

## सुरेगावात भटक्या कुत्र्यांचा उच्छाद; तातडीने उपाययोजनांची मागणी

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील सुरेगाव (गंगा) येथे भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. गावातील रस्त्यांवर कुत्र्यांचे कळप फिरत असल्याने महिला, शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येची दखल घेत पत्रकार प्रल्हाद शिंदे यांनी सुरेगाव (गंगा)-बोरगाव ग्रामपंचायतीचे प्रशासक व ग्रामविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले. भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांवर हल्ले होण्याची तसेच चावण्याच्या घटना घडण्याची शक्यता असून, विशेषतः रात्रीच्या वेळी नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ग्रामपंचायतीने संबंधित पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयाने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. तसेच कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण आणि नियमांनुसार व्यवस्थापन करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# गोधेगाव येथे महान तपस्वी श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांचा जन्म दिन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : श्री गुरूदेव दत्त पीठ देवगड क्षेत्राचे उद्धारक महान तपस्वी श्री समर्थ सदगुरू किसनगिरीबाबा यांची जन्मभूमी असलेल्या नेवासा तालुक्यातील गोधेगाव येथे सदगुरू किसनगिरी बाबांचा जन्म दिन देवगड गुरूदेव दत्त पिठाचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. साधूंचा अवतार व त्यांची प्रत्येक क्रिया दुःखाच्या निवारणासाठी जगाच्या उद्धारासाठी असते असे प्रतिपादन स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले.



श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांचे सेवाधारी भक्त मंडळ व गोधेगाव ग्रामस्थ यांच्या उत्कृष्ट नियोजनात जन्मदिन सोहळयाचे आयोजन गुरूवारी करण्यात आले होते.जन्मदिनाच्या निमित्त श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या पादुकांचे व जन्मस्थानाचे पूजन गुरुवर्य भास्करगिरी बाबा व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य कांतागुरू जोशी यांनी केले. यावेळी बोलतांना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी दिलेल्या भेटी प्रसंगी उपस्थित भाविकांना संदेश दिला की सदगुरू किसनगिरी बाबांच्या कार्याची महती व या परिसराचे नाव देशभर गेले असून संत परंपरेत अवतीर्ण होऊन त्यांनी भक्तांना सुख व समाधान प्राप्त करून दिले आहे. या प्रसंगी श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा सेवाधारी मंडळाच्या वतीने गुरुवर्य शांतीब्रम्ह भास्करगिरी बाबाजी व स्वामी प्रकाशानंदगिरी यांचे संतपूजन करण्यात आले.

यावेळी टाकळीभान येथून भक्त परिवाराच्या वतीने पायी दिंडी काढण्यात आली होती या दिंडीचे स्वागत करण्यात आले. जन्मदिन सोहळयाप्रसंगी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित भाविकांना आमटी भाकरी प्रसादाचे वाटप करण्यात आले.सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी गोधेगाव येथील श्री समर्थ सदगुरू किसनबाबा सेवाधारी मंडळींनी विशेष प्रयत्न केले.

# शासनाने शेतकऱ्याचे व्याज भरावे : सुनील गडाख

## सोनई सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई / शनिशिंगनापूर** : राज्यसरकारने शेतकऱ्याची कर्जमाफी केली पण त्यापुढील होणारे चालू व्याज शासनाने भरावेत, असा संस्थेने ठराव करून शासनाकडे प्रस्ताव पाठवावा व शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी असे प्रतिपादन जिल्हा परिषद बांधकाम समितीचे माजी सभापती सुनीलराव गडाख यांनी केले. ते सोनई सोसायटीच्या वार्षिक सभेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन रामराव गडाख हे होते. गडाख म्हणाले, मुळा धरण भरले असले तरी रोटेशन बाबतीत संशका असून, दुष्काळी सावट होण्याची भीती व्यक्त करून हिरवा चारा येण्यासाठी पाण्याचे चोख नियोजन करण्याचे मत व्यक्त केले.



प्रास्ताविक भाषणात जेष्ठ मार्गदर्शक हभप विश्वासराव गडाख म्हणाले,माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखाली सहकार वृद्धी वाढत असून सभासदांकडील थकबाकी वाढत असताना, सभासदांनी शेती पिकाचे योग्य नियोजन करून, पीक कर्ज घेऊन संस्थेला वेळेत भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन केले. संस्थेचे सचिव विकास ढोबळे यांनी अहवाल वाचन करून सविस्तर माहिती दिली. लेखापाल संतोष गडाख यांनी सविस्तर आर्थिक लेखाजोखा विषद मांडला. प्रारभी दिवगंत यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. स्वागत संचालक आप्पासाहेब निमसे यांनी तर आभार संचालक कचरू जामदार यांनी मानले. प्रा. रामकिसन शिंदे, संचालक भाऊसाहेब येळवंडे, व बाप्पुसाहेब बारगळ यांनी मनोगत व्यक्त केले.

व्हा. चेअरमन दादासाहेब दरंदले, गजानन दरंदले,देवस्थानचे माजी विश्वस्त आदिनाथ शेटे, मुळाचे संचालक वसंतराव कुसळकर, दिनकर घावटे,बाळासाहेब बनकर,संजय घावटे, नामदेव येळवंडे, संचिता सुहास वैरागर, मीराबाई बाबुराव घावटे,जिजाबाई कचरू जामदार, पांडुरंग अनारसे, भास्कर भुसारी, अजय लोंढे, संजय कैतके, मच्छिन्द्र शिंदे, आदी उपस्थिती होती. सभेला सभासद वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. भाऊसाहेब येळवंडे यांनी दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्याचा ठराव मांडला.सचिव विकास ढोबळे यांनी विषयपत्रीकेवरील विषयांची सविस्तर माहिती दिली. सर्व विषयांना मंजूरी देण्यात आली.

# ग्रामसखींच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान, विमा लागू करा

## उमेद केडर संघटनेच्या महिलांचे आ. प्राजक्त तनपुरे यांना निवेदन



**उमेद केडर संघटनेच्या मागण्या रास्त : तनपुरे**

उमेद केडर संघटनेच्या महिलांच्या मागण्या रास्त असून, महाराष्ट्र राज्य सरकारकडे या प्रश्नांचा निपटारा करण्यासाठी प्रयत्न करेन. प्रसंगी आगामी अधिवेशनातही हे प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले जाईल.

**प्राजक्त तनपुरे, आमदार, अहिल्यानगर विधान परिषद**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : ग्रामसखींच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान तसेच विमा संरक्षण लागू करावे, अशी मागणी उमेद महिला केडर राज्य संघटनेच्या तालुकाध्यक्ष वर्षाताई बाचकर यांच्यासह सदस्यांनी केली. यासंदर्भातील निवेदन आमदार प्राजक्त तनपुरे यांना त्यांच्या संपर्क कार्यालयात देण्यात आले. यावेळी राहुरी तालुक्यातील लाख, गणेगाव, त्रिंबकपूर, पिंपळगाव फुणगी, रामपूर, ताहराबाद, खुडसरगाव, कोपरे, शेनवडगाव, पाथरे खुर्द, देसवंडी, दवणगाव, टाकळीमिया, केंदळ खुर्द, सात्रळ, सोनगाव, बारागाव नांदूर, कानडगाव, धानोरे, कनगर व शिलेगाव आदी गावांतील पशुसखी व कृषिसखी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. निवेदनात म्हटले आहे की, महिला केडर राज्य संघटनेच्या बैठकीत झालेल्या निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. ग्रामसखींच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

जोपर्यंत विमा किंवा सानुग्रह अनुदान लागू करण्याबाबत शासन निर्णय होत नाही, तोपर्यंत गावातील गटांची स्थापना, ग्रामसंघ व प्रभाग संघांचे 'कट ऑफ' काढणे, बैठकींना उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन करणे आदी कामे केली जाणार नाहीत. तसेच प्रभाग, तालुका किंवा प्रभाग संघाच्या बैठकीलाही उपस्थित राहणार नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. 'उमेद' अभियानांतर्गत गाव व प्रभाग स्तरावरील ऑनलाइन कामाचा मोबदला मिळत नसल्याने, राज्य संघटनेने ठरविल्याप्रमाणे कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

उमेद महिला केडर संघटनेच्या वतीने राज्यभर आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. तसेच महिलांना दरमहा १५ हजार रुपये मानधन देण्याची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर उमेद केडर संघटनेच्या तालुकाध्यक्ष वर्षाताई बाचकर, कोषाध्यक्ष रूपाली झगडे, सचिव कल्याणी खपके, स्मिता देवरे, झरीना पठाण, उषा माळवदे, प्रतीक्षा शिंदे, अश्विनी पावसे, सोनाली कडू, रुकसाना शेख, मंगल आढाव, प्रतिभा इंगळे, सपना बोर्डे यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

तालुकाध्यक्ष वर्षाताई बाचकर यांनी आमदार प्राजक्त तनपुरे यांच्यासमोर महिलांच्या विविध समस्या मांडून राज्य सरकारकडे या मागण्यांचा पाठपुरावा करण्याची विनंती केली.

# शालेय कुस्ती स्पर्धेत त्रिमूर्तीच्या कुस्तीपटूंचे घवघवीत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व क्रीडा कार्यालय अहिल्यानगर, नेवासा तालुका क्रीडा समिती व दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, त्रिमूर्तीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय तालुका कुस्ती स्पर्धा दिनांक १७ सप्टेंबर रोजी त्रिमूर्ती कुस्ती संकुल या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या.



या शालेय तालुकास्तर कुस्ती स्पर्धेत त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील कुस्ती पटूंनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेसाठी तालुक्यातून मोठ्या प्रमाणात खेळाडूंनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सीईओ डॉ.गौरव आमलेपाटील होते तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष देविदास अंगरक, प्राचार्य सोपानराव काळे, तुवर पाटील, संजय राजगुरू, नारायण कडूपाटील तसेच तालुक्यातून क्रीडा शिक्षक व पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. विजयी खेळाडू खालील प्रमाणे १४ वर्षे वयोगट युवराज संतोष गादे, अनिकेत कैलास उंडे, रोहित किरण पाटील, श्रावण भारत कदम, समर्थ जगन्नाथ गायके, प्रणाली प्रकाश बनकर, श्रुती मनोज भोंगळ, स्वरा सचिन पवार, श्रावणी निलेश चव्हाण, शुभ्रा अश्विन जाधव. १७ वर्षे वयोगट अविनाश संतोष हिप्परगी, प्रतीक बाबूराव शिरसाट, प्रेम प्रमोद कदम, देवानंद विश्वंभर राऊत ,भावेश शिवाजी परदेशी, संग्राम चांगदेव सातव, गौरव किरण पाटील, हर्षल अशोक भारस्कर, आदित्य कैलास, वेदांत बाळासाहेब उंडे, वेदांत नितीन बोरुडे. १९ वर्षे वयोगट यश जालिंदर घारे, तुषार राजेंद्र भनगे, उज्ज्वल गणेश पहारे, सायली तानाजी खरात या खेळाडूंनी आपापल्या वजन गटात प्रथम क्रमांक पटकावले.

सर्व खेळाडूंना त्रिमूर्ती कुस्ती केंद्राचे कोच संभाजी निकाळजे, संजय यादव यांचे मार्गदर्शन लाभत आहे. तसेच क्रीडा प्रशिक्षक अभिजीत दळवी,महादेव काकडे, छबुराव काळे,गणेश शिंदे,अशोक पानखडे, साहेबराव दाणे,संदीप वाघमारे, शैलेश दाणे यांचे सहकार्य लाभत आहे.

यशस्वी विद्यार्थिनीचे त्रिमूर्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगेपाटील, उपाध्यक्ष ड.स्नेहल घाडगेपाटील, सहसचिव डॉ.श्रुती आमलेपाटील,विश्वस्त चेतन चव्हाणपाटील, सीईओ गौरव आमलेपाटील,प्राचार्य सोपानराव काळे, समन्वयक दत्तात्रय वांढेकर, निवासी प्राचार्य एकनाथ कापसे, क्रीडा विभाग प्रमुख संभाजी निकाळजे,विभाग प्रमुख अशोकराव गाडे,जितेंद्र पाटील, बाळासाहेब साबळे, नवनाथ भस्मे यांनी अभिनंदन केले.

# स्वच्छता अभियानाला सार्वजनिक बांधकाम खात्याचाच चुना




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च करून स्वच्छता अभियान राबविले जात असताना राहुरी येथील नगर मनमाड महामार्गावरील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय मात्र स्वच्छता अभियानाला जणू काही अपवाद ठरले आहे.

कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच कचरा, घाण आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून, स्वच्छतेच्या नावाखाली विभागाची उदासीनता चव्हाट्यावर आली आहे. कार्यालयाच्या प्रवेशद्वार परिसरात साचलेल्या कचऱ्यामुळे तीव्र दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे कार्यालयात येणारे नागरिक तसेच कर्मचारी यांना नाक मुठीत धरूनच परिसरातून मार्ग काढावा लागत आहे. दुर्गंधीचा त्रास सहन करीत कर्मचारी कार्यालयीन कामकाज करीत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, याबाबत येथील अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता, आम्हाला स्वच्छतेसाठी स्वतंत्र निधी मिळत नाही.

स्वच्छता करणे हे आमचे काम नाही. आमचे काम रस्ते, बांधकाम आणि त्याचे नियोजन करणे आहे. स्वच्छता ठेवायची असेल तर शासनाने स्वतंत्र निधी द्यावा; निधी मिळाल्यास स्वच्छतेचे कामही करू, अशी भूमिका एका वरिष्ठ अधिकाऱ्याने खाजगीत बोलताना मांडल्याचे समजते.

शासनाच्या विविध कार्यालयांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली जात असताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग दिसत असल्याने 'स्वच्छता अभियान नेमके कोणासाठी?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. रस्ते आणि इमारती उभारण्याची जबाबदारी असलेल्या विभागाच्या कार्यालयालाच घाणीचा विळखा पडला असल्याने संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून परिसराची स्वच्छता करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**जाहीर नोटीस**

जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की मिळकतीचे वर्णन- जि. अहिल्यानगर ता. संगमनेर पैकी मौजे शिंदोडी ग्रामपंचायत हद्दीतील

सर्व्हे नंबर-२१५, क्षेत्र हे. आर-७.२० ख. ०.३२-एकुण-७.५२, आकार रु. पैसे.०३२

यासी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असे. वर वर्णन केलेली मिळकत ही १. ज्सोस्ना छगनलाल फिरोदिया, २. लता श्रीकांत कटारिया, ३. किशोर छगनलाल फिरोदिया, ४. राहुल छगनलाल फिरोदिया, ५. संतोष छगनलाल फिरोदिया, सर्व रा. अहिल्यानगर ता. जि. अहिल्यानगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलाने त्यांचे बरोबर खरेदी विक्रीचे व्यवहाराची बोलणी करुन सदरची मिळकत कायमस्वरुपी रजिस्टर खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकत निर्वेध, निष्कर्जी, कोणत्याही प्रकारचा बोजा नसल्याबाबतची तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वाद नसल्याची खात्री वरील इसमांनी आमचे अशिलांस दिली आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क अथवा इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अथवा हक्क इ. असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून आठ (८) दिवसांचे आत कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध निर्जाखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील, नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. तसेच परस्पर घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, ही नोटीस असे. ता. १७/०९/२०२६.

कळावे,

**ॲड. एस.ए. हासे
संगमनेर कोर्ट, संगमनेर ता. संगमनेर,
जि. अ.नगर, मो.नं.९६२३३७७८२४**

**जाहिर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एस/आर/१३४/२०२६
नेवासा दिनांक : ०२/०७/२०२६

अर्जदार श्री श्रीम-सुनिल भास्कर कुऱ्हाडे, रा.घोडेगाव ता.नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन कै.भास्कर मारूती कुऱ्हाडे यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, मृत्यू नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै.भास्कर मारूती कुऱ्हाडे, गावाचे नाव-रा.घोडेगाव, मृत्यू दिनांक-१५/०७/२०२२

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लवकरच दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करणार

ताकदीने उभे राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, गणेशोत्सवानिमित्त दरे गावी आलेल्या शिंदे यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत बांबूसह विविध वृक्षांची लागवड केली. गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह जगभरातील मराठी समाजासाठी मोठा सांस्कृतिक महोत्सव असल्याचे सांगत त्यांनी पर्यावरण रक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचे आवाहन शिंदे यांनी केले.

### आता 'अशोक'ची निवडणूक नाही...

सध्या सभासद आणि कामगारांच्या भेटीगाठी घेत असून एकत्रित सूर कारखान्याचे व्यवस्थापन बदलण्याकडे दिसतो. दहा महिन्यांपासून कामगारांचे पगार थकले. कारखाना कर्जबाजारी झाला असून व्याजाचे हप्ते देखील वेळेत भरले जात नाहीत. आता पुढे कारखाना सुरू करण्यासाठी लागणारी तज्ञ ते कसे करणार? याबाबत स्पष्टता नाही. शेतकऱ्यांना ऊसाला किमान ३८०० रुपये भाव मिळायला हवा. अशोक कारखाना हा कार्यक्षेत्राच्या केंद्रस्थानी आहे. बैलगाडीने ऊस कारखान्यात येऊ शकतो. तोडणी वाहतूक सर्वात कमी असायला हवी. मात्र अशोक कारखान्याचा तोडणी वाहतूक खर्च सध्या राज्यात सर्वाधिक आहे. टणामागे तब्बल ७०० रुपये व्याज भरण्यात जातात. हे व्याज थांबू शकते. मात्र सीए असलेल्या कारखाना प्रमुखाने त्यासाठी अद्याप प्रयत्न केले नसल्याची खंत भोसले यांनी व्यक्त केली. कारखाना ताब्यात देतो तुम्ही चालून दाखवा, असे आव्हान गेल्या गळीत हंगामाला मुरकुटे यांनी दिले होते, ते पेलण्याची आपली तयारी असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. अशोक कारखान्याच्या येत्या सर्वसाधारण सभेत सहकार खात्याच्या तसेच गृह खात्याच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सुकाणू समिती निर्मितीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. सत्ताधाऱ्यांनी ते थांबवण्याचा प्रयत्न करू नये. तसा प्रयत्न केला तरी तो यशस्वी होणार नाही, असेही भोसले आणि ताके यांनी यावेळी सांगितले.

..................

### शेतावरच उसाची रिकव्हरी तपासून दर ठरविणार : सुजय विखे

संतुलित आहार घेऊन आपली तब्येत चांगली ठेवतो. त्याचप्रमाणे प्रवरा कारखान्यालाही ऊसतोडीच्या बाबतीत संतुलित नियोजन करून इतर कारखान्यांप्रमाणे अडचणीत येऊ नये, याची काळजी घेतली जाईल, असे ते म्हणाले. मेळाव्यास आयोजक दीपक पटारे, बाबासाहेब चिडे, गिरीधर आसने, शरद नवले, संजय फंड, राजेश अलघ, रवी गुलाटी, रवी पाटील, संजय गांगड, नानासाहेब पवार, रामभाऊ लिप्टे, गणेश मुदगुले, भाऊसाहेब बांद्रे, बाळासाहेब पटारे, डॉ. शंकर मुठे, श्रीनिवास बिहाणी, किशोर बनसोडे, बजरंग दरंदले, राधाकृष्ण आहेर, मनोज नवले, सर्जेराव मुंढे, खंडेराव सदाफळ, अभिजित खंडागळे, आशिष धनवटे, अविनाश पवार, राजेंद्र पवार, लक्ष्मण भवार, भैरव कांगुणे, महेंद्र पटारे, गंगाधर बनसोडे, दिनकर बनसोडे, रावसाहेब मुरकुटे, रवी मुरकुटे, विजय अशोक गोरे, सुरेश गोरे, दत्तात्रय शेळके यांच्यासह परिसरातील आजी-माजी सरपंच, चेअरमन, कार्यकर्ते व ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अकारी पडीत जमिनींच्या वाटपासाठी मुख्यमंत्री येणार

अकारी पडीत जमिनींच्या प्रश्नावर बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अनेकांनी केवळ वल्गना केल्या. विखे पाटील परिवारावर खंडकरी, निळवंडे आणि अकारी पडीत जमिनींच्या प्रश्नावर टीका करण्यात आली. मात्र, या प्रश्नांची सोडवणूक माजी खासदार (कै.) बाळासाहेब विखे पाटील आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. अकारी पडीत जमिनींच्या प्रश्नाची सोडवणूक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, मंत्रिमंडळात जमिनींच्या वाटपाचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांची तारीख घेऊन जमिनींच्या वाटपाचा भव्य सोहळा आयोजित करण्यात येईल. वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एकमध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही कोणतेही शुल्क न घेता केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

..................

### निवृत्त कर्नलचीच बांधकाम व्यावसायिकांकडून फसवणूक?

माहितीनुसार, दुबे हे भारतीय लष्करातून कर्नल पदावरून निवृत्त झाले आहेत. त्यांचा मुलगा व सून हे एअर फोर्समध्ये फायटर जेट पायलट असून सध्या प्रयागराज येथे सेवेत आहेत. २०१३ मध्ये जम्मू-काश्मीर येथे भारत-पाकिस्तान सीमेवर कर्तव्य बजावत असताना दुबे यांनी कुटुंबासाठी अहिल्यानगर येथे घर घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दरेवाडी येथील नगर-सोलापूर रोड परिसरातील गट क्रमांक १२२/२ मध्ये प्रस्तावित असलेल्या एल.एस.व्ही.एस. डेव्हलपर्सच्या 'लोटस शलाका' प्रकल्पात फ्लॅट बुक करण्याचे त्यांनी ठरविले. सी-२ विंगमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक २०३ चा व्यवहार सुमारे २६ लाख रुपयांना ठरल्याचे फिर्यादीत नमूद आहे. प्रकल्पाचा ताबा २०१७ मध्ये देण्याचे आश्वासन देण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानुसार दुबे यांनी १३ मे २०१३ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक चौक शाखेच्या धनादेशाद्वारे दोन लाख रुपये, तर १५ मे रोजी आणखी ११ लाख ९२ हजार ६२५ रुपये असे एकूण १३ लाख ९२ हजार ६२५ रुपये दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

मात्र, त्यानंतर प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाले नसल्याने दुबे यांनी संबंधितांकडे विचारणा केली. त्यावेळी संरक्षण खात्याची परवानगी मिळालेली नसून, यासंदर्भात औरंगाबाद खंडपीठात दावा दाखल असल्याचे आणि निकाल आपल्या बाजूने लागेल, असे सांगण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

२०१७ मध्ये फ्लॅटचा ताबा मिळणे अपेक्षित असतानाही तो मिळाला नाही. त्यामुळे दुबे यांनी बुकिंगची रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. त्यावेळी रक्कम परत करण्याचे तसेच करारानुसार नऊ टक्के व्याज देण्याचे आश्वासन देण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, २०१८ मध्ये नवीन घर घेण्यासाठी पैशांची आवश्यकता असल्याने दुबे यांनी पुन्हा संबंधितांकडे रक्कम मागितली. मात्र, त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याचा आरोप आहे. त्यानंतरही 'आज देतो', 'महिन्याने देतो', अशा आश्वासनांवर पैसे परत करण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

२०२३ मध्ये लष्करातून निवृत्त झाल्यानंतर दुबे कुटुंबासह अहिल्यानगर येथे स्थायिक झाले. त्यानंतर त्यांनी संबंधित व्यक्तीच्या दुकानावर जाऊन पैशांची मागणी केली. २०२४ मध्ये डेव्हलपर्सच्या संबंधित मालकांशी पुन्हा संपर्क साधून बुकिंगची रक्कम परत मागितली असता, पैसे परत करण्याची जबाबदारी सुशिल सारडा यांच्यावर सोपविण्यात आल्याचे सांगण्यात आल्याचा दावा फिर्यादीने केला आहे.

फिर्यादीनुसार, २०२४ पासून २१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सुशिल सारडा यांनी टप्प्याटप्प्याने एकूण १ लाख १० हजार रुपये परत केले. त्यानंतर आणखी ५० हजार रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले; मात्र तेही मिळाले नाहीत. त्यानंतर संबंधितांचा फोन बंद असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दुकानावर चौकशी केली असता सुशिल सारडा हे अमेरिकेला गेल्याचे त्यांच्या भावाने सांगितल्याचा दावाही करण्यात आला आहे.

१६ सप्टेंबर २०२६ पर्यंत वेळोवेळी फोन करून उर्वरित रकमेची मागणी करूनही पैसे मिळाले नसल्याने अखेर दुबे यांनी १८ सप्टेंबर रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी चौघांविरुद्ध आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# धर्मांतर प्रकरणावरून माळीघोगरगावात सकल हिंदू समाजाचा मोर्चा

## महंत रामगिरी महाराजांची उपस्थिती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील माळीघोगरगाव येथे नोकरीचे आमिष दाखवून धर्मांतर केल्याच्या आरोपावरून वीरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर सकल हिंदू समाजाच्या वतीने गावात मोर्चा काढण्यात आला. मोर्चात महंत रामगिरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी त्यांनी या प्रकरणावरून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले.नोकरीत कायम करण्याचे आमिष दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला असून, या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वृत्त आहे. मोर्चाला संबोधित करताना रामगिरी महाराज यांनी पोलिसांनी तक्रारदारांची तक्रार वेळीच



दाखल करून घेणे आवश्यक होते, मात्र या प्रकरणात विलंब झाल्याचा आरोप केला. तसेच संबंधित शाळेतील एका फादरविरोधात विद्यार्थिनीची छेडछाड केल्याची तक्रार करण्यात आली होती; मात्र त्यावर कारवाई झाली नसल्याचा दावाही त्यांनी केला. अनुदानित शाळेत धर्मप्रचार केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे रामगिरी महाराज यांनी सांगितले. दरम्यान, मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सकाळपासूनच गावात पोलिसांचा फौजफाटा असल्याने गावाला छावणीचे स्वरूप आले होते.

**राजकीय नेत्यांच्या अनुपस्थितीची चर्चा**

मोर्चात राजकीय नेत्यांच्या अनुपस्थितीचीही चर्चा झाली. यावेळी अजय पाटील साळुंके यांनी संत-महंतांनी धर्माच्या मुद्द्यावर पुढाकार घेतल्याचे सांगत राजकीय नेत्यांवर टीका केली. त्यांच्या या वक्तव्याचीही मोर्चात चर्चा झाली.

## सिद्धनाथ वाडगाव येथे तालुकास्तरीयबुद्धिबळ स्पर्धा संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील सिद्धनाथ वाडगाव येथील श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील शालेय क्रीडा स्पर्धांना बुधवारी (दि. १६) सुरुवात झाली.



यातील पहिली तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेत तालुक्यातील २५ शाळांमधील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदवला.सहभाग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शाळेचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब शिरसाट, तालुका क्रीडा समन्वयक शफी शेख, सचिव प्रमोद महाजन, क्रीडा शिक्षक संदीप माघाडे, चंद्रशेखर जाधव, अनिल शेरे, संदीप कुमावत, आकाश इंगळे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. आबासाहेब शिरसाट म्हणाले, ''ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य संधी, मार्गदर्शन आणि भौतिक सुविधा उपलब्ध झाल्यास तेही क्रीडा क्षेत्रात आपली चमक दाखवू शकतात.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार स्पर्धांचे व्यासपीठ मिळावे, यासाठीच श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.'' स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना शाळेच्या वतीने मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशाल काळुंके, प्रशांत उबाळे, योगेश देवबोने, शिवनाथ चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कुबेर प्रतिष्ठाण गणेश मंडळाचा अभिनव उपक्रम; ४० गणेशभक्तांचे रक्तदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत हरिदास गल्लीतील कुबेर प्रतिष्ठाण गणेश मंडळातर्फे शुक्रवारी (ता. १८) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ४० गणेशभक्तांनी रक्तदान करून गणरायाला नमन केले. शिबिराचा प्रारंभ सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी तथा ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत सकाळी नऊ वाजता झाला. छत्रपती संभाजीनगर येथील दत्ताजी भाले रक्तपेढी, डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या कर्मचारी वर्गाने आप्पासाहेब सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तसंकलन केले. यापूर्वी मंडळाच्या गणेशभक्तांनी गोशाळेतील गायींना चारा दिला. तसेच खंडोबा मंदिर परिसरात वृक्षारोपण करून वृक्षांचे संगोपन, संरक्षण व संवर्धन करण्याचा संकल्प केला. अध्यक्ष गौरव दौडे यांच्यासह मधुकर कुहिले, गणेश पहाडी, महेश आंबेकर, आकाश चापानेरकर, कृष्णा क्षीरसागर, सचिन गिरे, महेश पहाडी, स्वप्नील राजपूत, कोमल वर्मा, विशाल दाभाडे, अमोल तास्कर, आकाश हिवाळे आदी सहभागी झाले.



## उपजिल्हा रुग्णालयाचे काम मार्चपर्यंत पूर्ण करा

### अन्यथा ठेकेदार बदला: आ. अमोल खताळ यांचा इशारा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** शहरालगतच्या घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाचे शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर करण्यात आले असून, इमारतीचे बांधकाम संथगतीने सुरू आहे. संबंधित ठेकेदाराने कामाला गती देऊन मार्चपर्यंत बांधकाम पूर्ण करावे. अन्यथा ठेकेदाराकडून काम काढून घेऊन नवीन ठेकेदाराची नियुक्ती करण्यात येईल, असा इशारा आमदार अमोल खताळ यांनी दिला. घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या सनियंत्रण व सल्लागार समितीची बैठक आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी जिल्हा रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवशंकर वलांडे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक तथा समितीचे सचिव डॉ. राजकुमार जऱ्हाड, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, विनायक वाडेकर, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, युवा सेना शहरप्रमुख सौरभ देशमुख आदी उपस्थित होते.

उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची असून, कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे खताळ यांनी स्पष्ट केले. मार्चपर्यंत काम पूर्ण करण्यासाठी काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. उपजिल्हा रुग्णालयाचे काम पूर्ण होईपर्यंत ग्रामीण रुग्णालयाचे कामकाज ट्रॉमा केअर सेंटरमध्ये सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ग्रामीण रुग्णालयाच्या जागेवर प्रस्तावित स्त्री रुग्णालय उभारण्याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

साकूर, चंदनापुरी व तळेगाव परिसरातील नागरिकांना शवविच्छेदनासाठी संगमनेरला दूरवर जावे लागू नये, यासाठी या ठिकाणी शवविच्छेदनगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. ग्रामीण रुग्णालयातील पाणीपुरवठा, पाण्याची टाकी, स्वच्छतागृह तसेच परिसरातील रस्त्यांवरील खड्ड्यांच्या समस्या तातडीने सोडविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

शहरातील धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णालयाबाहेर 'धर्मादाय रुग्णालय' असा स्पष्ट फलक लावावा. पंधरा दिवसांत याबाबत पाहणी करून अहवाल सादर करावा. तसेच ग्रामीण भागात वैद्यकीय शिबिरे आयोजित करून रुग्णांना योग्य सेवा-सुविधा मिळतील, याची दक्षता घ्यावी, असेही खताळ यांनी सांगितले.

## प्रवरा महोत्सवात ४३४ विद्यार्थ्यांनी साकारला महाराष्ट्राचा कलाविष्कार

### संतपरंपरा, इतिहास, लोककला आणि सामाजिक प्रबोधनाचे सादरीकरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** संतपरंपरेचा जागर, कृष्णा माझी छेड काढितो, पंढरीची वारी, संत तुकाराम महाराजांचे चरित्र, गौळण, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जीवनपट, व्यसनमुक्तीचा संदेश, एकांकिका, नाटिका व एकपात्री प्रयोग अशा विविध कलाविष्कारांनी लोणी येथील श्रीराम मंदिर परिसर सांस्कृतिक रंगांनी न्हाऊन निघाला. प्रवरा सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवात प्रवरा शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी कला, संस्कृती आणि परंपरेचा अनोखा संगम सादर करीत रसिकांची दाद मिळवली. गणेशोत्सवानिमित्त सुरू असलेल्या या महोत्सवातील लोणी येथील सांस्कृतिक कार्यक्रमात परिसरातील ११ शाळांमधील ४३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला व सांस्कृतिक परंपरेचे विविधांगी दर्शन घडविले. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोणीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला 'छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान' हा देखावा विशेष आकर्षण ठरला. तसेच अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यावर आधारित सादरीकरणातून इतिहासाची प्रभावी ओळख करून देण्यात आली. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व क्रीडा कौशल्याला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारांचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे परीक्षण कलाकार ज्ञानेश्वर निबे व गंगाराम धनवटे यांनी केले. उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील इंटरनॅशनल स्कूल, अहिल्याबाई होळकर विद्यालय आणि पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व लोणी पंचक्रोशीतील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाण्याच्या स्त्रोतांभोवती भूजल उपशाला लगाम!

पान १ वरुन

करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.मांजरा धरणाच्या पाइपलाइनमधून होणारी कथित पाणीचोरी रोखण्यासाठी लातूर, बीड आणि धाराशिव या तीन जिल्ह्यांचे संयुक्त पथक तयार करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. अवैध पाणी उपसा करणाऱ्यांविरुद्ध संयुक्त कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

पाऊस लांबल्याने संभाव्य पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करण्यासाठी राज्य सरकारने भूजल उपशावर निर्बंध, जलस्रोतांचे संरक्षण आणि टँकरपूर्वी पर्यायी उपाययोजनांना प्राधान्य देण्याची भूमिका घेतली आहे

खरीप नुकसानीच्या अचूक नोंदीचे आदेश

कमी पावसाचा खरीप पिकांनाही मोठा फटका बसला आहे. पीक कापणी प्रयोगांच्या माध्यमातून नुकसानीच्या पारदर्शक आणि अचूक नोंदी ठेवण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याचा योग्य लाभ मिळण्यास मदत होणार आहे. संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठीही प्रशासनाने आगाऊ नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

टँकर हा शेवटचा पर्याय

पाणीटंचाई निवारणासाठीच्या एकूण दहा उपाययोजनांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याची उपाययोजना वगळता उर्वरित नऊ उपाययोजनांना प्रथम प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत. या उपाययोजना शक्य नसतील, अशाच ठिकाणी टँकर किंवा बैलगाडीच्या माध्यमातून पाणीपुरवठा करावा. तसेच टँकरवर जीपीएस यंत्रणा बसविण्याची अट समाविष्ट करण्याचे निर्देश परिपत्रकात देण्यात आले आहेत.

## निधन

### जालिंदर धनवडे



**राहुरी :** राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथील रहिवासी तथा महात्मा फुले कृषी विद्यापीठातील सेवाभावी व्यक्तिमत्त्व जालिंदर देवराम धनवडे (६४) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांनी म फु कृ विद्यापीठात शासकीय सेवेत कार्यरत असताना आपल्या कर्तव्याबरोबरच सामाजिक बांधिलकीही जपली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, जावई असा परिवार आहे.

### दत्तू माळी



**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील औरंगपूर येथील. दत्तू भीमा माळी आदिवासी भिल्ल समाजाचे अत्यंत गरीब व जनसेवा मंडळाचे व विखे पाटील परिवाराचे खंदे समर्थक होते. शेवटपर्यंत त्यांनी विखे पाटील परिवाराचे निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून काम केले. दत्तू भीमा माळी यांचे (वय ७०) नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### मुकुंद कुलकर्णी



अहिल्यानगर : येथील जुन्या कोर्टगल्ली भागातील रहिवाशी मुकुंद त्र्यंबक कुलकर्णी (कोंढेजकर) यांचे शुक्रवारी (दि. १८) सकाळी वृद्धापकाळामुळे निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा , तीन मुली, सून , नातवंडे, नाती, पतवंडे असा परिवार आहे. ते धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांच्या निधनाबद्दल परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.


**नावात बदल**

माझे पूर्वीचे नाव नाना काशिनाथ लबाडे असे होते ते बदलून आता नवीन नाव नानासाहेब काशिनाथ लबडे असे झाले आहे वडिलांचे नाव- काशिनाथ सयाजी लबडे आईचे नाव- लिलाबाई काशिनाथ लबडे प्रतिज्ञापत्र क्र २६५२२४२०४१२६८१००७१८९६३ दिनांक १६/०९/२०२६

**नावात बदल**

माझे पूर्वीचे नाव अक्षय भिमराज रोहम असे होते ते बदलून आता नवीन नाव अक्षय भिमराज रोहोम असे झाले आहे वडिलांचे नाव- भिमराज गोविंद रोहोम. आईचे नाव- ताराबाई भिमराज रोहोम प्रतिज्ञापत्र क्र २६५२२४२०४१२६८१००७१८९५१ दिनांक १६/०९/२०२६

**नावात बदल**

माझे पूर्वीचे नाव बाजीराव बाळासाहेब सोनवणे असे होते, ते बदलून आता नवीन नाव बाजीराव बाळू सोनवणे असे झाले आहे. वडिलांचे नाव- बाळू दिपू सोनवणे आईचे नाव- कचराबाई बाळू सोनवणे. प्रतिज्ञापत्र क्र -२६५२२४२०४१२६८१००७१८९६८ दिनांक १६/०९/२०२६

**नावात बदल**

माझे पूर्वीचे नाव सतिश कचरू लुटे असे होते ते बदलून आता नवीन नाव सतिश कचेश्वर लुटे असे झाले आहे . वडिलांचे नाव कचेश्वर कोंडाजी लुटे. आईचे नाव हिराबाई कचेश्वर लुटे. प्रतिज्ञापत्र क्र २६५२२४२०४१२६८१००७१८९५८ दिनांक १६/०९/२०२६

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE OLD NAME IN MY PARVEEN SHAKIR SHAIKH (BEFORE NAME) TO NEW NAME AS PARVIN SHAKIR SHAIKH (AADHAR NO. 2463 6890 4729) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE- SHRIRAMPUR DATE- 18/09/2026



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

शनिवार दि. १९ सप्टेंबर २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

५ — १४० २३० ७८० | ३ — १२० ६३० ५८० | ६ — १५० १६९ ६००

१५-५२-९३-३४-०६-६१

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

७ — १६० २५० ३४० | ६ — २८९ ३०७ ६०० | २ — १५६ १२९ २२८

५७-७१-३६-०४-३२-२५

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

० — १९० २८० २४४ | ४ — १३० ३३८ ४४६ | ७ — १२४ ७४९ ३००

१०-०५-६४-४८-९७-७३



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६



**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 885 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 788 | 160 71 128 | 679 29 155 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 688 | 235 48 275 | 246 25 258 | 248 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 898 79 450 | 568 96 178 | 147 22 125 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 568 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 468 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 448 89 135 | 590 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 598 48 134 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 17/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 24/08/2026 | 240 6 | | | | |

# पदापेक्षा जनता महत्वाची; शेतकऱ्यांसाठी बँकेत हक्काचा आवाज हवा : आ. कर्डिले

## स्व. कर्डिलेंचा सहकारातील वारसा पुढे नेण्याचा संकल्प



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** आयुष्यात अनेक पदे येतील-जातील. मात्र पदापेक्षा मला जनता महत्त्वाची आहे. माझा जीव सर्वसामान्य जनतेत आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी नगर तालुक्याचा जिल्हा बँकेत हक्काचा उमेदवार असणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आमदार अक्षय कर्डिले यांनी केले.

कृषी उत्पन्न बाजार समिती पदाधिकारी, तालुक्यातील विविध गावांतील आजी-माजी पदाधिकारी तसेच जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी ठराव झालेले मतदार यांची बैठक माजी सभापती भानुदास कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी जिल्हा बँकेच्या मतदानासाठी ठराव झालेले मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत तालुक्यातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांची जिल्हा बँकेतील उणीव भरून काढण्यासाठी आ. अक्षय कर्डिले यांना जिल्हा बँकेत संचालक म्हणून पाठविण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी बोलताना आ. अक्षय कर्डिले म्हणाले, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कर्जापासून विविध सहकारी संस्थांच्या प्रश्नांपर्यंत अनेक बाबी जिल्हा बँकेशी संबंधित आहेत. शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्यासाठी बँकेत नगर तालुक्याचा हक्काचा प्रतिनिधी असणे आवश्यक आहे.

स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. बळीराजाच्या समस्या तळागाळात जाऊन समजून घेत त्यावर निर्णय घेण्याला त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळे कारखानदारांची बँक अशी ओळख असलेल्या जिल्हा बँकेला खऱ्या अर्थाने 'शेतकऱ्यांची बँक' म्हणून ओळख निर्माण करून देण्याचे काम त्यांनी केल्याचे आ. अक्षय कर्डिले यांनी सांगितले.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले जातात. त्यामुळे आगामी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत नगर तालुक्याचा स्वतःचा हक्काचा प्रतिनिधी बँकेत असणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडायचे असतील तर त्यासाठी योग्य व्यासपीठ आणि शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडणारे नेतृत्व आवश्यक आहे असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी आ. अक्षय कर्डिले यांना जिल्हा बँकेत संचालक म्हणून पाठवून शेतकरीहिताचा शिवाजीराव कर्डिले यांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार केला.

**जनतेशी नाळ ; पदाची आस नाही!**

आयुष्यात अनेक पदे येतील-जातील. मात्र पदापेक्षा मला जनता महत्त्वाची आहे. माझा जीव सर्वसामान्य जनतेत आहे. या आ.अक्षय कर्डिले यांच्या भूमिकेने बैठकीत उपस्थित कार्यकर्त्यांचे लक्ष वेधले. जनतेशी असलेली नाळ आणि शेतकरीहिताला प्राधान्य देत स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांचा सहकारातील वारसा पुढे नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

**कर्डिले नावाचा सहकारातील विश्वास !**

स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेत जिल्हा बँकेच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवणारा हाच वारसा आता आ. अक्षय कर्डिले यांनी पुढे न्यावा यासाठी नगर तालुक्यातील कार्यकर्ते एकवटले असून त्यांना जिल्हा बँकेत पाठविण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला.

बळीराजांच्या हितासाठी जिल्हा बँकेमध्ये संचालक म्हणून आ. अक्षय कर्डिले यांचे नेतृत्व गरजेचे आहे. स्व.आमदार शिवाजीराव कर्डिले यांचा सहकारातील वारसा व शेतकरी हिताचे निर्णय आ. अक्षय कर्डिले हेच घेऊ शकतात. आ. अक्षय कर्डिले यांना शेतकऱ्यांच्या समस्यांची जाण आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी त्यांचे नेतृत्व गरजेचेच आहे.

**सुनील पवार**

---

## द•ख•ल

### माय-लेकीसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा वाढदिवस



**पाथर्डी शहर :** वाढदिवस म्हटला की शुभेच्छांचा वर्षाव, सत्कार आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन, असे नेहमीचे चित्र पाहायला मिळते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पाथर्डीत या रूढ चौकटीला छेद देणारा आणि सामाजिक संवेदनशीलतेची जाणीव करून देणारा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील क्रांतिवीर वीर सावरकर मैदान परिसरात तसेच तत्कालीन नगरपरिषद कार्यालयाच्या पायऱ्यांचा आश्रय घेत वास्तव्यास असलेल्या जनाबाई राजू पवार आणि त्यांच्या अपंग कन्या रेणुका राजू पवार यांच्यासोबत प्रा. सुनील पाखरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस साजरा केला. यावेळी माय-लेकीला किराणा साहित्य व फळे देण्यात आली. अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न तसेच महाराष्ट्र शासन पुरस्काराचे मानकरी कडू भाऊ लोंढे यांच्या हस्ते ही मदत सुपूर्द करण्यात आली. या माय-लेकीच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद हीच आमच्यासाठी खरी शुभेच्छा आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच आम्ही दोघेच होतो; कारण गरीबाच्या घरी जायला लोक लाजतात, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

### शेतकऱ्यांना पाणी न मिळाल्यास आत्मदहनाचा इशारा



**शेवगाव / ढोरजळगांव :** मुळा धरणातून सुरू असलेल्या रोटेशन मधून शेतकऱ्यांना पाणी न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा शेवगाव तालुक्यातील सामनगाव,लोळेगाव आणि मळेगाव कार्यक्षेत्र असलेल्या स्वामी समर्थ पाणी वापर संस्थेच्या पदाधिकारी व शेतक-यांनी दिला आहे.याबाबत मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांची समक्ष भेट घेऊन दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी दुष्काळी स्थितीचा विचार करून शासनाने शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून मुळा उजव्या कालव्यातून सध्या आपत्कालीन रोटेशन सोडण्यात आले आहे. मात्र दहा पंधरा दिवस उलटून गेले तरी शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव शाखा कालव्याच्या अंतर्गत येणाऱ्या टेलच्या भागातील स्वामी समर्थ पाणीवापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील(मायनर-९) सामनगाव,मळेगाव आणि लोळेगाव या भागात अद्याप पुरेसे पाणी मिळालेले नाही. दुष्काळाची तीव्रता अधिक असलेल्या या भागात पाऊस व पाण्याअभावी पाण्याचा प्रश्न अधिक बिकट बनलेला आहे . संस्थेकडे पाणी मागणी केलेल्या शेतकऱ्यांचे १००पेक्षा अधिक हेक्टर क्षेत्राचे भरणे बाकी असताना वरील हेडच्या भागातील संस्था व शेतकऱ्यांकडून पाणी पळवले जाते आहे. चालू आवर्तनातून या भागातील शेतकऱ्यांना त्वरित व पुरेसे पाणी मिळाले नाही तर संस्थेचे पदाधिकारी व शेतकरी पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहेत,याची नोंद घेऊन त्यानुसार पाणी वाटपाचे नियोजन करावे,अशी मागणी स्वामी समर्थ पाणी वापर संस्था पदाधिकारी व शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी भाऊसाहेब घुगरे, नामदेव तागड, भानुदास काळे, गोकुळ पठाडे, महेश नजन आदीसह सामनगाव, मळेगाव व लोळेगाव येथील शेतकरी उपस्थित होते.

### निघोज परिसर कृषी फलोद्यान सह.संस्था रविवारी वार्षिक सर्वसाधारण सभा

**निघोज :** निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२० रोजी संस्थेच्या गांडूळखत प्रकल्प ईमारत सभागृहात सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लामखडे व उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांनी दिली आहे. १९९८ ला शेतकरी हितासाठी निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी या संस्थेची स्थापना केली. शेतकऱ्यांना कमी पाणी व कमी खर्चात शेती उत्पादन घेता यावे तसेच शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी संस्थेची संकल्पना कै. कवाद यांनी मांडली गेली २५ वर्ष कै कवाद यांनी मार्गदर्शन करीत संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाठबळ देण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. शेतकऱ्यांसाठी पथदर्शी प्रकल्प राबवून कवाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी या भागातील शेतकऱ्यांसाठी लोकप्रबोधन मेळावे घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम केले आहे. फलोद्यान संस्थेचा गांडूळखत प्रकल्प असो किंवा खत डेपो, माफक दरात खते औषधे या माध्यमातून शेतकऱ्यांना या संस्थेत क्रेडिट देण्याचे काम होत असून शेतकऱ्यांना या संस्थेचा मोठ्या प्रमाणात आधार असल्याची प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लामखडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून सभासदांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे सचिव रवींद्र रसाळ व संचालक मंडळाने केले आहे.

---

# शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांची श्रीराम विद्यालयाला भेट



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव :** अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्यावतीने जिल्ह्यातील माध्य व उच्च माध्य विद्यालयांची वार्षिक तपासणी काम सुरू झाले. गुरुवारी जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी श्रीराम माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय ढोरजळगाव येथे अचानक भेट देऊन शाळा अभिलेख व विद्यार्थ्यांना पुरवल्या जाणाऱ्या भौतिक सुविधा,शाळेचा परिसर,वर्ग अध्यापन याची तपासणी करून आढावा घेतला व त्रुटी बद्दल सूचना केल्या. यावेळी संध्या गायकवाड यांना नुकताच राष्ट्रीय शैक्षणिक योजना व प्रशासन संस्था नवी दिल्ली यांचेवतीने शैक्षणिक क्षेत्रातील नवोपक्रम व शैक्षणिक प्रशासनातील योगदानाबद्दल मिळालेल्या पुरस्काराबद्दल कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूह व श्रीराम विद्यालय ढोरजळगाव यांचेवतीने सत्कार करण्यात आला.सेवा संकल्प अभियानातंर्गत मानवी साखळीच्या माध्यमातून राष्ट्रीय प्रतिकांची रांगोळी व कलाकृती यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनींनी सादर केली. यावेळी शिक्षणाधिकाऱ्यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी जि.प अहिल्यानगर चे शिक्षण विस्तार अधिकारी पवार साहेब, शेळके साहेब, कवळे साहेब, बोरुडे साहेब यांचेसह विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे,पर्यवेक्षिका सुरेखा शेलार यांचेसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विदयार्थी उपस्थित होते.

# 'साहेब, आमची शिष्यवृत्ती केव्हा येणार?'

## कचरा वेचकांच्या मुलांची समाजकल्याण अधिकाऱ्यांसमोर आर्त हाक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** साहेब, आमची शिष्यवृत्ती केव्हा येणार? आमचे आई-बाबा कचरा वेचण्याचे काम करतात. आमची आर्थिक परिस्थिती खूप अडचणीची आहे. शिक्षणासाठी आम्हाला या शिष्यवृत्तीची गरज आहे, अशा शब्दांत कचरा वेचकांच्या पाल्यांनी समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या. मागील वर्षापासून शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याने अखेर विद्यार्थ्यांनी शुक्रवारी (दि. १८ सप्टेंबर) थेट जिल्हा परिषद गाठत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी विद्यार्थ्यांनी समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांना गुलाबपुष्प देत आपल्या हक्काच्या शिष्यवृत्तीची आठवण करून दिली.

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या कचरा वेचकांच्या पाल्यांना शासनाच्या माध्यमातून दरवर्षी ३ हजार ५०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. कचरा वेचक कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी ही रक्कम शिक्षणाच्या खर्चासाठी महत्त्वाची ठरते. मात्र, अहिल्यानगर शहरातील पात्र विद्यार्थ्यांना मागील वर्षाची शिष्यवृत्ती अद्याप मिळालेली नसल्याने त्यांच्या शिक्षणासमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

शिष्यवृत्ती मिळण्यासाठी कचरा वेचक पालक अस्वच्छ व्यवसायात काम करत असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे सांगण्यात येत होते. संबंधित पालकांकडे हे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले होते. ही बाब लक्षात आल्यानंतर कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत संघटनेने याबाबत सातत्याने पाठपुरावा केला. संघटनेच्या प्रयत्नांतून संबंधित कचरा वेचक पालकांना ते अस्वच्छ व्यवसायात काम करत असल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले. तसेच अहिल्यानगर शहरातील विविध शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची नावे आणि आवश्यक कागदपत्रे संबंधित शाळांकडे देण्यात आली. त्यामुळे प्रमाणपत्राचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला.

मात्र, आवश्यक प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यानंतरही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याने संघटनेने पुन्हा पाठपुरावा सुरू ठेवला. गेल्या वर्षभरापासून यासाठी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे संघटनेने सांगितले. शिष्यवृत्तीच्या ऑनलाइन प्रक्रियेबाबत संबंधित विभागाकडे विचारणा केली असता, ऑनलाइन साईटच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे, असे सांगण्यात येत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. ऑनलाइन प्रक्रियेतील तांत्रिक अडचणींचा फटका गरीब कचरा वेचक कुटुंबातील विद्यार्थ्यांना बसू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे.

कचरा वेचकांचे आई-वडील शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज अस्वच्छ आणि प्रतिकूल परिस्थितीत काम करतात. अत्यंत मर्यादित उत्पन्नात ते आपल्या मुलांचे शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारी ३ हजार ५०० रुपयांची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसाठी मोठी मदत ठरते. त्यामुळे मागील वर्षाची प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली.

# बेलवंडी व्यापारी पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**बेलवंडी :** बेलवंडी व्यापारी सहकारी पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बेलवंडी येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात चेअरमन उत्तम डाके यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. संस्थेने आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदांचा विश्वास यामुळे सलग २३ वर्षे 'अ' वर्ग ऑडिट मिळविण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना चेअरमन उत्तम डाके यांनी संस्थेच्या प्रगतीमध्ये सभासद, ठेवीदार, संचालक मंडळ आणि कर्मचारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. पतसंस्थेने स्थापनेपासून सलग २३ वर्षे सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याची परंपरा कायम ठेवली आहे. सध्या संस्थेचे एकूण १ हजार ६४२ सभासद असून, चालू आर्थिक वर्षात पतसंस्थेला १ कोटी ८९ लाख रुपयांचा नफा झाला आहे. तसेच संस्थेने ५० कोटी रुपयांच्या ठेवींचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला आहे. या आर्थिक प्रगतीमुळे बेलवंडी व्यापारी पतसंस्थेने सहकार क्षेत्रात आपली विश्वासार्हता अधिक मजबूत केली आहे. यावेळी पतसंस्थेचे सचिव किसन वऱ्हाडे यांनी संस्थेच्या कारभाराचा अहवाल वाचन करून मागील आर्थिक वर्षातील कामकाज, आर्थिक व्यवहार आणि संस्थेच्या प्रगतीचा आलेख सभासदांसमोर मांडला. संस्थेच्या आर्थिक प्रगतीबद्दल सभासदांनी समाधान व्यक्त केले. यावेळी नागवडे कारखान्याचे माजी उपाध्यक्ष ज्ञानदेव हिरवे, संचालक सावता हिरवे, माजी चेअरमन सोपान हिरवे, उपसरपंच बाळासाहेब ढवळे, भैरवनाथ सोसायटीचे चेअरमन विजय काळाने, समता पतसंस्थेचे चेअरमन सुनील ढवळे यांच्यासह अनिल लबडे, दिनेश इथापे, हौसराव लाढाणे, संतोष काळाने, संतोष शिंदे यांनी मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी माजी चेअरमन सोपान हिरवे,व्हा. चेअरमन अर्जुन हिवरकर, संचालक युवराज पवार, अरुण काळाने, दौलत भोसले, ज्ञानदेव वैद्य, दीपक कोद्रे, अनिल शेलार, राजेंद्र साळवे, शिवाजी श्रीराम, संतोष हिरवे, विठ्ठल लोखंडे, प्रमोद क्षीरसागर, वैशाली शेलार, लता घोडकर यांच्यासह पतसंस्थेचे कर्मचारी आशा दरवडे, सचिन जाधव, प्रवीण खेडकर तसेच मोठ्या संख्येने सभासद व ठेवीदार उपस्थित होते.

# कन्या विद्यालयाच्या सुवर्णकन्यांचा सन्मान सोहळा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**कर्जत :** गुणवत्ताधारक विद्यार्थी हेच शाळेचे खरे भूषण असून त्यांचा सन्मान-सोहळा करण्याचे समाधान शिक्षकांसह शाळेला मिळणे याला देखील भाग्य लागते. जे उत्तीर्ण झाले त्यांचे कौतुक आहे. मात्र ज्यांना यश नाही आले त्यांनी नाउमेद होऊ नये. कुठे कमी पडलो याच आत्मचिंतन करा आणि यापेक्षा उतुंग यश मिळवा असे आवाहन रयतचे गुणवत्ता कक्ष अधिकारी काकासाहेब वाळुंजकर यांनी केले.

ते कर्जत येथे सोनमाळी कन्या विद्यालयाच्या सुवर्णकन्यांचा गुणगौरव सोहळयात बोलत होते. यावेळी विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

रयत शिक्षण संस्थेच्या सौ सोनाबाई नामदेवराव सोनमाळी कन्या विद्या मंदिराच्या विविध स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक क्षेत्रात चमकलेल्या सुवर्णकन्या विद्यार्थिनींचा गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी रयतचे उत्तर विभाग गुणवत्ता कक्ष अधिकारी काकासाहेब वाळुंजकर, मुख्याध्यापिका मेहजबीन पठाण, कर्जतच्या नगराध्यक्षा छाया शेलार यांच्यासह स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य, शालेय समित्यांचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी दहावीच्या परीक्षेत तालुक्यात प्रथम आलेली विद्यालयाची श्रुती नेटके, राज्य पातळीवर इयत्ता ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत श्रेया जाधव हिने राज्यात १२ वा क्रमांक मिळवला होता त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच पाचवी शिष्यवृत्तीच्या तीन, सातवी शिष्यवृत्तीमध्ये पाच तर आठवी शिष्यवृत्ती विक्रमी नऊ विद्यार्थिनीना देखील सन्मानित करण्यात आले.

यासह आरटीएस, आठवी नवोदय, एनएमएमएस आणि ऑलिम्पियाड परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या विद्यार्थिनीना फेटा बांधत सत्कार करण्यात आला. यावेळी प्रास्तविक करताना मुख्याध्यापिका मेहजबीन पठाण म्हणाल्या की, विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण उपक्रमाचे फलित समोर बसलेल्या सुवर्णकन्या विद्यार्थिनीच्या रुपात पाहावयास मिळत असून पालक देखील यात सहभागी होत असल्याचे आवर्जून नमूद केले. विद्यार्थिनीना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे त्यांनी प्रास्ताविकात कौतुक केले.

# एमआयडीसीत पाच दिवसाच्या 'गणरायाला' भावपूर्ण निरोप

## गुलालाची उधळण ढोल-ताशांच्या गजरात निघाली विसर्जन मिरवणूक



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** एमआयडीसी परिसरात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या गणेशोत्सवाची सांगता शुक्रवारी (दि. १८ सप्टेंबर) भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात झाली. स्वराज्य कामगार संघटनेच्या पुढाकाराने एक्साईड कंपनीत प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या श्री गणेशाच्या मूर्तीचे पाचव्या दिवशी पारंपरिक पद्धतीने विसर्जन करण्यात आले. ढोल-ताशांचा निनाद, गुलालाची उधळण, गाण्यांच्या तालावर धरलेला ठेका आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

गणेशोत्सवाच्या पाच दिवसांत कंपनी परिसरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भक्तिमय वातावरणात गणेशोत्सव साजरा केल्यानंतर शुक्रवारी विसर्जन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. सत्यनारायण महापूजा झाल्यानंतर एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. या गणेश विसर्जन सोहळ्यास एक्साईड कंपनीचे प्लांट हेड शखदीप बर्धन, युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, स्वराज्य कामगार संघटनेचे अध्यक्ष दत्ता तापकिरे, कामगार संघटना सहसचिव सुनील कदम, हेमा शेळके, मनीषा झावरे, पोलीस कॉन्स्टेबल उमेश शेरकर, पोलीस कॉन्स्टेबल किशोर जाधव, एचआर हेड संजय तेनी, प्रोडक्शन हेड राहुल चव्हाण, सेफ्टी हेड अमोल अटक, इलेक्ट्रिशन हेड मुकेश बोडखे, गणेश उत्सव कमिटी कामगार प्रतिनिधी स्वप्निल खराडे, दिपक परभाने, वसीम शेख, अभिजीत साबारे, अजिनाथ शिरसाठ, रमेश शिंदे, प्रदीप दहातोंडे, शशिकांत संसारे, जितेंद्र तळेकर, किसन तरटे, संतोष शेवाळे, नामदेव झेंडे, रामनाथ घुगे, सचिन खेसे, पोपट जगताप, गौरव पाटोळे, शरद थोरात, रमेश देशमुख, अनिल बाचकर, राहुल जगधने, अमोल ठोकळ, फिरोज शेख, तुषार शेवाळे, निलेश शेवाळे, नितीन खेसे, तुषार शेवाळे, ज्ञानदेव तोडमल, महेश काळे, अनिल बाचकर, रमेश देशमुख, अनिल गायकवाड, रवि शेटे, सागर ठाणगे यांच्यासह कंपनीतील सर्व विभागप्रमुख, अधिकारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विसर्जन मिरवणुकीचे विशेष आकर्षण म्हणजे कंपनीतील सर्वधर्मीय कामगारांनी एकत्रितपणे घेतलेला सहभाग. विविध धर्म आणि समाजघटकांतील कामगारांनी कोणताही भेद न ठेवता गणरायाच्या मिरवणुकीत उत्साहाने सहभाग घेतला. त्यामुळे मिरवणुकीत धार्मिक सौहार्द, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडले. पारंपरिक ढोल-ताशांच्या तालावर कामगारांनी उत्साहात ठेका धरला. गाण्यांच्या तालावर नृत्य करत आणि गणरायाच्या जयघोषात कामगारांनी मिरवणुकीचा आनंद लुटला. महिला कामगारांनीही मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गणरायाला भक्तिभावाने निरोप दिला.

# पशुपालकांना घरबसल्या पशुवैद्यकीय सल्ला

## टेलिकन्सल्टेशनद्वारे ४१९८ पशुपालकांना तज्ज्ञांचा सल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पशुपालकांना घरबसल्या पशुवैद्यकीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे, यासाठी पशुसंवर्धन विभागाने सुरू केलेल्या व्हॉट्सअ‍ॅप आधारित संवाद सेवा व ध्वनी-चित्र दूरवैद्यकीय सल्ला सेवेला राज्यभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत ४१९८ पशुवैद्यकीय दूरसल्ले यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले असून, ४९०७ संवादांची नोंद झाली आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या सहकार्याने भारत फायनान्शियल इन्क्लुजन लिमिटेड व इंडसइंड बँकेच्या सामाजिक दायित्व निधीतून पशुसंवर्धन आयुक्तालयात संपर्क केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून पशुपालकांना जनावरांचे संगोपन, आहार, प्रजनन, आरोग्य, विविध आजार, चारा व चारा पिकांचे व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक उपाययोजना आणि विविध शासकीय योजनांबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळत आहे.

ध्वनी-चित्र दूरवैद्यकीय सल्ला सेवेद्वारे पशुपालकांना तज्ज्ञ पशुवैद्यकांशी थेट संपर्क साधता येतो. एप्रिल ते सप्टेंबरदरम्यान एकूण ७६२९ पशुधनासाठी तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात आला. यामध्ये शेळी व मेंढ्यांसाठी २४२३, कुक्कुटपालनासाठी ४२५६ आणि गाय-म्हशींसाठी ८०८ वेळा मार्गदर्शन घेण्यात आले. कुत्रे, मांजरे तसेच इतर पाळीव पशुपक्ष्यांसाठीही ही सेवा उपलब्ध आहे.




लाळ्या-खुरकूत, आंत्रविषार, घटसर्प आणि पीपीआर यांसारख्या आजारांपासून पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी नियमित लसीकरण, जंतनाशकांचा वापर आणि योग्य आहार व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले जात आहे. आवश्यकतेनुसार पशुपालकांना नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय, बहुविशेषज्ञ पशुवैद्यकीय चिकित्सालय किंवा फिरत्या पशुवैद्यकीय पथकाकडे पाठविण्यात येते. या उपक्रमाचे संनियंत्रण सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. दत्तात्रय गाडे करीत आहेत.

आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील म्हणाले, ''डिजिटल माध्यमातून पशुपालकांच्या दारात आधुनिक पशुवैद्यकीय सेवा पोहोचविणे हे विभागाचे धोरण आहे. दुर्गम भागातील पशुपालकांनाही एका क्लिकवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, ई-प्रिस्क्रिप्शन आणि उपचाराची दिशा मिळत आहे. या सुविधेचा पशुपालकांनी अधिकाधिक लाभ घ्यावा.''

सहआयुक्त पशुसंवर्धन पशुआरोग्य व रोगनियंत्रण डॉ. शैलेश केंडे म्हणाले, ''पशुधनाचे आरोग्य आणि रोग नियंत्रणासाठी ही डिजिटल यंत्रणा उपयुक्त ठरत आहे. अल्प कालावधीत सात हजारांहून अधिक पशुधनासाठी वैद्यकीय सल्ला उपलब्ध झाला असून, लसीकरण, जंतनाशके आणि योग्य आहार व्यवस्थापनाबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन थेट पशुपालकांपर्यंत पोहोचत आहे.''

---

## दखल

### देशी गाईंच्या संगोपनासाठी गोशाळांना अनुदान

**पुणे :** महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडील नोंदणीकृत गोशाळांमध्ये ठेवलेल्या अनुत्पादक देशी गाईंच्या देखभालीसाठी प्रति गाय, प्रति दिन ५० रुपये अनुदान देण्यात येत आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी पात्र गोशाळांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत.या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र गोशाळांनी १७ ते ३० सप्टेंबरदरम्यान आयोगाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावेत. योजनेचे पात्रता निकष, अटी-शर्ती, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज भरण्याची नियमावली आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.राज्यातील जास्तीत जास्त पात्र गोशाळांनी विहित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन पशुसंवर्धन विभाग, आयुक्त डॉ. किरण पाटील, महाराष्ट्र गोसेवा आयोग, अध्यक्ष शेखर मुंदडा आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, सदस्य सचिव तथा सहआयुक्त डॉ. शामकांत पाटील यांनी केले आहे. अनुदानामुळे गोशाळांना अनुत्पादक देशी गाईंच्या खाद्य, चारा आणि आरोग्याच्या गरजा भागविण्यास मदत होणार असून, ऑनलाइन अर्ज प्रणालीमुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ करण्यात आल्याचे आयोगाने म्हटले आहे.

### दूध भेसळीविरोधात गणेशोत्सवातून जनजागृती




**आळेफाटा :** सणासुदीच्या काळात वाढणाऱ्या दूध भेसळीला आळा घालण्यासाठी जय हिंद कॉलेज, जुन्नर येथील प्राध्यापक डॉ. अमित हेजिब यांनी गणेशोत्सवानिमित्त घरच्या गणपतीसमोर दूध भेसळविरोधी जनजागृतीपर देखावा साकारला आहे.

या देखाव्यात दुधात केली जाणारी भेसळ, ती ओळखण्याच्या सोप्या पद्धती तसेच भेसळयुक्त दुधामुळे होणारे आरोग्यावरील दुष्परिणाम याबाबत प्रभावी संदेश देण्यात आला आहे. पर्यावरणपूरक सजावटीतून सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक होत आहे.

गणेशोत्सवासारख्या उत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याची जुन्नरची परंपरा या उपक्रमातून पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दूध भेसळीबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

### आळंदीत धार्मिक देखाव्यांना भाविकांची गर्दी




**आळंदी :** गणेशोत्सवानिमित्त आळंदी शहरातील विविध गणेश मंडळांनी साकारलेल्या धार्मिक व सांस्कृतिक देखाव्यांना नागरिक व भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पीएमपीएमएल बसस्थानकाजवळ जय गणेश ग्रुपतर्फे साकारलेली काशी विश्वनाथ बाबा मंदिराची प्रतिकृती आणि आवारी हॉस्पिटलजवळ जय गणेश प्रतिष्ठानतर्फे उभारलेला 'नवनाथ दर्शन' देखावा आकर्षण ठरत आहे.

जय गणेश ग्रुपतर्फे उभारलेल्या काशी विश्वनाथ मंदिराच्या प्रतिकृतीला आकर्षक मंदिररचना, विद्युत रोषणाई आणि भक्तिमय वातावरणाची जोड देण्यात आली आहे. सायंकाळच्या वेळी हा देखावा पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. जय गणेश ग्रुप अध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा देखावा साकारण्यात आला आहे.जय गणेश प्रतिष्ठानतर्फे 'नवनाथ दर्शन' हा धार्मिक देखावा उभारण्यात आला आहे. नवनाथांच्या विविध रूपांचे दर्शन घडावे, या उद्देशाने देखाव्याची मांडणी करण्यात आली असून, प्रकाशयोजना व भक्तिमय वातावरणामुळे भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. जय गणेश प्रतिष्ठान अध्यक्ष सागर उर्फ गोविंद कुऱ्हाडे यांच्या पुढाकारातून हा देखावा साकारण्यात आला.जय गणेश ग्रुप अध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी सांगितले की, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी आणि नागरिकांना भक्तिमय अनुभव मिळावा, या उद्देशाने काशी विश्वनाथ मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली आहे.जय गणेश प्रतिष्ठान अध्यक्ष सागर उर्फ गोविंद कुऱ्हाडे यांनी सांगितले की, नाथपरंपरा व अध्यात्माची ओळख युवा पिढीसह नागरिकांना व्हावी, या उद्देशाने 'नवनाथ दर्शन' देखावा साकारण्यात आला आहे.

---

## भुलेश्वर येथे महादेवाच्या पिंडीवर सूर्यकिरणांचा अभिषेक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात जागृत देवस्थान तसेच शिल्पसौंदर्याचा खजिना म्हणून ओळख असलेल्या श्री क्षेत्र भुलेश्वर मंदिरात शुक्रवारी सकाळी सूर्योदयाच्या वेळी किरणोत्सवाचा दुर्मिळ योग आला. सूर्यनारायणाच्या पहिल्या किरणांनी महादेवाच्या पिंडीचे दर्शन घेतले. हा नेत्रदीपक आणि भक्तिमय क्षण पाहण्यासाठी भुलेश्वर पंचक्रोशीतील तसेच परिसरातील भाविकांनी सकाळपासून मोठी गर्दी केली होती.

सूर्य उगवल्यानंतर सूर्याचा पहिला किरण सुमारे शंभर फूट अंतर पार करून थेट शिवलिंगावर पडला. सूर्यकिरण पिंडीवर पडताच शिवलिंग सोनेरी दिसू लागले. हा क्षण भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला. किरणोत्सवाचा योग येताच भाविकांनी 'हर हर महादेव'चा जयघोष केला. त्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.



भुलेश्वर मंदिरात वर्षातून दोन वेळा सूर्यकिरणोत्सव होतो. मार्च महिन्यात २८ मार्च रोजी होणारा किरणोत्सव उन्हाळ्याचे दिवस असल्याने साधारण २० ते २५ मिनिटे चालतो. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात १६ किंवा १७ तारखेला दुसऱ्यांदा किरणोत्सव होतो. मात्र सप्टेंबरमध्ये पावसाळ्याचे दिवस असल्याने अनेकदा आकाश ढगाळ असते. त्यामुळे सूर्यकिरणे शिवलिंगापर्यंत पोहोचत नसल्याने हा दुर्मिळ योग दरवर्षी पाहायला मिळत नाही.

यंदा गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शुक्रवारी सकाळी आकाश स्वच्छ होते. त्यामुळे सूर्य उगवताच किरणे मंदिराच्या विशिष्ट रचनेतून थेट शिवलिंगावर पडली आणि किरणोत्सवाचा योग साधला. हा क्षण पाहण्यासाठी सकाळीच भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी केली होती.

सप्टेंबर महिन्यात सूर्यकिरणे थेट पिंडीपर्यंत येणे दुर्मिळ मानले जाते. यापूर्वी २००२ मध्ये असा योग आल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर २०१४, २०१७ आणि २०२१ मध्येही भुलेश्वर मंदिरात सप्टेंबरमधील किरणोत्सवाचा योग आला होता. त्यामुळे यंदाचा किरणोत्सव पाहण्यासाठी परिसरातील भाविकांमध्ये विशेष उत्सुकता होती. सूर्यकिरणांनी महादेवाच्या पिंडीवर अभिषेक केल्याचा हा अद्भुत क्षण भाविकांनी भक्तिभावाने अनुभवला.

---

## वडगावपीर-मांदळेवाडीत चारा टंचाईचे संकट; दूध उत्पादनात घट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील वडगावपीर, मांदळेवाडी व लोणी परिसरात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाअभावी शेतातील पिके सुकू लागल्याने हिरवा चारा उपलब्ध होत नसून, जनावरांसाठी बाहेरून चारा खरेदी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.या परिसरात मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसाय केला जात असल्याने हिरवा चारा व पशुखाद्याची मागणी मोठी आहे. मात्र चारा खरेदीचा खर्च वाढल्याने दुग्ध व्यवसायाचा आर्थिक ताळमेळ बिघडला आहे. दुधाला चांगला बाजारभाव मिळत असतानाही चाऱ्याच्या कमतरतेमुळे दूध उत्पादनात घट होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

पावसाचा खंड आणखी वाढल्यास जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीची तातडीने पाहणी करून चारा उपलब्धतेबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.वडगावपीरचे माजी सरपंच संजय पोखरकर यांनी चारा टंचाई अधिक तीव्र होण्यापूर्वी प्रशासनाने जनावरांसाठी चारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे.

## ढाकी वस्तीत मृत कोंबड्यांचा खच; बिबट्याच्या वावराने भीती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कवठे-मिडगुलवाडी रस्त्यालगत ढाकी वस्ती परिसरातील शेतांमध्ये तसेच वनविभागाच्या हद्दीत मृत कोंबड्या उघड्यावर टाकल्या जात असल्याने दुर्गंधी व अस्वच्छता निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, परिसरात बिबट्याचा वावर असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.



मृत कोंबड्यांमुळे भटक्या कुत्र्यांसह वन्यप्राण्यांचा वावर वाढण्याची शक्यता आहे. याच आठवड्यात बिबट्याने तीन शेळ्यांवर हल्ला करून त्या ठार केल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.मृत कोंबड्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करावी आणि परिसराची तातडीने स्वच्छता करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी आरोग्य विभाग व ग्रामपंचायतीकडे केली आहे.

## रामलिंग येथे विद्यार्थ्यांची धावणे स्पर्धा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच शारीरिक व मानसिक विकासासाठी खेळांचे महत्त्व असून, खेळामुळे आत्मविश्वास, शिस्त, एकाग्रता, सहनशक्ती आणि स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होते. याच उद्देशाने रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था आणि स्व. गणेश गौतम घावटे पाटील यांच्या वतीने रामलिंग, शिरूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी धावणे स्पर्धा घेण्यात आली.

सौ. राणीताई कर्डिले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या स्पर्धेत इयत्ता पहिली ते सातवीतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी खिलाडूवृत्तीने स्पर्धेत सहभाग नोंदवत धावण्याच्या कौशल्याचे प्रदर्शन केले. प्रत्येक वर्गातील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता व प्रतिभा असून, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे उपस्थितांनी सांगितले. शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळांनाही महत्त्व दिले पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.यावेळी पंचायत समिती सभापती स्वाती घावटे, ग्रामसदस्य केशव शिंदे, डॉ. वैशाली साखरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश लोंढे, तसेच ग्रामसदस्य लता इसवे, शिरूर शहर राष्ट्रवादी युवती अध्यक्ष श्रुतिका झांबरे, राष्ट्रवादी उपाध्यक्ष शीतल शर्मा, शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## गणेशोत्सवात विजेचा लपंडाव

### आरतीच्या वेळी वीज खंडित होत असल्याने नागरिकांत नाराजी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** गौरी-गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर दौंड तालुक्याच्या ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण असताना महावितरणकडून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी आरतीच्या वेळेतच वीज गायब होत असल्याच्या तक्रारी गणेशभक्तांकडून करण्यात येत आहेत.

तालुक्यात विविध ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली असून, दररोज पूजा, आरती, महाप्रसाद तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मात्र, कार्यक्रमांच्या वेळेतच वीजपुरवठा खंडित होत असल्याने मंडळांसह गणेशभक्तांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. गौरी सजावट आणि धार्मिक कार्यक्रमांमध्येही वीज खंडित होण्याचा परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

पूर्वसूचना न देता वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने सणासुदीच्या काळात नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वीजपुरवठा खंडित होण्यामागील नेमके कारण काय आणि हा प्रकार कधी थांबणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

लोकप्रतिनिधी आणि महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत तातडीने लक्ष घालून ग्रामीण भागातील वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, तसेच वारंवार वीज खंडित होण्याची कारणे शोधून सणासुदीच्या काळात नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

## रक्तदानातून सामाजिक बांधिलकीचा संदेश

### कवठे येमाईत १२० जणांचे रक्तदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने श्री गुरुदेव दत्त ग्राम विकास प्रतिष्ठान, कवठे येमाई ता.शिरूर यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिक व तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल १२० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक कर्तव्याची जाणीव जपली.



'सेवा हेच धर्म' हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. सकाळी ८ ते सायंकाळी ६ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास भविष्यात गरज पडल्यास एक रक्तपिशवी मोफत उपलब्ध करून देण्याची सुविधा देण्यात आली.

तसेच रक्तदात्यांना प्रोत्साहन म्हणून वॉटर जॅकेट अथवा हेल्मेट यापैकी एक भेटवस्तू देण्यात आली.शिबिर दरम्यान उपस्थितांना रक्तदानाचे आरोग्यविषयक फायदे, रक्तदाब व रक्तातील साखर नियंत्रणाचे महत्त्व तसेच गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

'एका रक्तदानातून तीन जणांचे प्राण वाचू शकतात' हा सामाजिक संदेश देत नियमित रक्तदानाचे आवाहन करण्यात आले.शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल परिसरातील ग्रामस्थ व नागरिकांनी प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले. आयोजकांनी रक्तदाते, वैद्यकीय पथक, सेवाभावी कार्यकर्ते व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

---

## शिरूर जिल्हा बँक निवडणुकीत तिरंगी लढतीचे संकेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, शिरूर तालुक्यात निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे. माजी आमदार अशोक पवार यांच्याविरोधात माजी संचालक स्व. अरुणआबा गायकवाड यांचे पुत्र स्वप्नील गायकवाड यांनी निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे.

त्याचबरोबर शिरूर पंचायत समितीचे माजी उपसभापती राजेंद्र जासूद यांनीही निवडणूक लढविण्याची तयारी दर्शविल्याने तालुक्यात तिरंगी लढतीचे संकेत मिळत आहेत.

सहकारी संस्थांचे ठराव अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू असताना शिरूर तालुक्यात विविध भागांत उमेदवारांकडून मोर्चेबांधणी सुरू आहे. ठराव मिळविण्यावरून काही ठिकाणी वाद निर्माण होऊन प्रकरण हाणामारीपर्यंत पोहोचले असून, पोलिसांत गुन्हेही दाखल झाले आहेत. काही ठिकाणी पोलिस बंदोबस्तात ठराव घेण्याची प्रक्रिया पार पडत आहे.

माजी आमदार अशोक पवार यांना सहकार क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि संस्थात्मक राजकारणाचा आधार आहे. स्वप्नील गायकवाड यांच्याकडे सहकार क्षेत्रातील स्व. अरुणआबा गायकवाड यांचा वारसा असून, युवकांशी असलेला संपर्क आणि विविध राजकीय नेत्यांशी असलेले संबंध यामुळे त्यांनी निवडणुकीसाठी तयारी केली आहे. राजेंद्र जासूद यांनाही पंचायत समितीतील अनुभव आणि स्थानिक पातळीवरील संपर्काचा फायदा मिळण्याची शक्यता आहे.

गेल्या जिल्हा बँक निवडणुकीत शिरूर तालुक्यात अशोक पवार यांचे वर्चस्व राहिले होते. मात्र, त्यानंतर घोडगंगा सहकारी साखर कारखाना बंद पडल्याने त्याचा परिणाम विधानसभा निवडणुकीत झाला. आता जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने ते पुन्हा सहकार क्षेत्रात सक्रिय झाले आहेत.पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व कायम राहते की, भाजपकडून बँकेच्या सत्तेसाठी जोरदार प्रयत्न होतात, याकडेही सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. शिरूर तालुक्यात तीन प्रमुख इच्छुक मैदानात उतरल्याने येथील निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत.


### जाहीर नोटीस

तमाम लोकास कळविण्यात येते, की खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक श्री. मनोज मधुकर देशपांडे रा. मोहन बिल्डिंग वैकुंठ भूमी जवळ नवी पेठ पुणे ४११०३०. हे सदर मिळकतीचे एकमेव मालक आहेत. परिशिष्ट अ) तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका-हवेली, पुणे महानगर पालिका हददीतील व मे. सब रजिस्ट्रार, हवेली क्र. १ ते २६ यांचे कार्यक्षेत्रातील, जिल्हा-पुणे, गाव मौजे शनिवार पेठ येथील सिटी सर्व्हे नं. २१२ या मिळकतीवर बांधलेल्या अमेय अपार्टमेंट या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील अपार्टमेंट/फ्लॅट नं. १०१ यासी क्षेत्र ९१५ चौ. फुट म्हणजेच ८५ चौ.मी. व जमिनीमधील अविभक्त हिश्यासह हि मिळकत.

सदरचे मिळकतीची खालील प्रमाणेः ०४/०८/२०२६ रोजी फ्लॅट नं १०१, अमेय अपार्टमेंट शनिवार पेठ पुणे ४११०३०. येथुन गहाळ झालेले आहेत. त्याकामी त्याचे खालीलप्रमाणे दस्ताचे वर्णनः

१. मुळ करारनामा दि. २२/०१/१९९६ सब रजिस्टार हवेली नं. १ दस्त क्र ४६७/१९९६ श्री. राजेंद्र देवीचंद धोका व सौ. मंजुषा राजेंद्र धोका खरेदी घेणार आणि श्री. वसंत बळवंत कुलकर्णी- खरेदी देणार यांचे मध्ये नोंदविलेला आहे. मूळ दस्त ऐवज सोबत इंडेक्स २ आणि रजिस्ट्रार पावती कागदपत्रे हरवलेली आहेत

२. मुळ करारनामा दि. ०३/०१/१९९१ अनोंदणीकृत दस्त श्री. वसंत बळवंत कुलकर्णी खरेदी घेणार आणि मे. त्रियानी कन्स्ट्रक्शन व विलास यशवंत रानडे खरेदी देणार यांचे मध्ये निष्पादित केलेला आहे.

सदचे मिळकतीचे वर नमुद मुळ मिळकतीचे, जर कोणास सदरचे मूळ दस्ताची कागदपत्रे मिळाल्यास /सापडल्यास त्वरीत वर नमुद पत्यावर आणुन दयावीत. यदाकादाचित जर कोणी या कागदपत्रांच्या आधारे काही चुकीचा वापर किंवा कोणी गैरवापर केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व त्यास आम्ही जबाबदार राहणार नाही. तसेच सदर कागदपत्रांच्या आधारे आमचे व्यत्तिरिक्त सदर मिळकतीबाबत कोणत्याही तिऱ्हाईत इसमाने सदर कागदपत्रे गहाण, तारण, विक्री, केल्यास त्याचा आमचेशी काहीही संबंध नाही सदर बाब आमचेवर बंधनकारक नाही. सदर दस्तांबाबत आमचे अशिलांनी दि. १६/०९/२०२६ रोजी लॉस्ट रिपोर्ट नं. १३३१९०/२०२६ फरासखान पोलीस ठाणे अतर्गत तक्रार नोंदविलेली आहे.

जर कोणासही सदर मिळकतीबाबत तक्रार असल्यास १५ (पंधरा) दिवसांच्या आत समक्ष भेटावे. याची दखल घ्यावी.

**अ‍ॅड.सचिन एन. पोटे**
कार्यालय येथे: सीटीएस क्र. 291, ऑफ क्र. 2, ग्राउंड फ्लोर, जयदीप अपार्टमेंट, दिलीप स्मृती भवन व्ही.एस. कोठारी रोड, न. काटे राम मंदिर, नारायण पेठ पुणे-411030.
मो. नं. 9657720187., ईमेल-advsnpote@gmail.com

दि. १९/०९/२०२६

# चातकाप्रमाणे शेतकऱ्यांची पावसाकडे नजर!

## पावसाची शक्यता दुरावली, दुष्काळ जाहीर करण्याची मागणी, पिके करपण्याच्या मार्गावर

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामावर पावसाच्या लहरीपणाचे संकट घोंघावत असून शेतकरी अक्षरशः चातक पक्ष्याप्रमाणे पावसाची वाट पाहत आहे. सुरुवातीला झालेल्या पावसानंतर पिकांनी चांगली उभारी घेतली होती; मात्र त्यानंतर पावसाने मोठी दडी मारल्याने सध्या अनेक भागांतील पिके पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. पुढील काळातही समाधानकारक पावसाची शक्यता दुरावत असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. त्यामुळे तालुक्यातील परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

तालुक्यात मका, कापूस, बाजरी, तूर यांसह विविध खरीप पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली आहे. सुरुवातीला पावसाने साथ दिल्याने शेतकऱ्यांनी महागडी बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर मोठा खर्च केला. मात्र पिकांना वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाची गरज असताना पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांची सारी गणिते बिघडली आहेत.



### पिकांची अवस्था चिंताजनक

सध्या अनेक शिवारांमध्ये जमिनीतील ओलावा कमी होत चालला असून पिकांची वाढ खुंटण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मका व बाजरी पिकांना पाण्याचा ताण जाणवत असून कापूस पिकालाही मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्यावर पिके वाचविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मात्र विहिरी, कूपनलिका आणि अन्य जलस्रोतांवरही मर्यादा असल्याने सर्वच क्षेत्राला पाणी देणे शक्य होत नाही.

### आभाळाकडे डोळे, शिवारात करपती पिके

दररोज आकाशात ढग जमा होतात; मात्र पाऊस बरसत नसल्याने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पुन्हा मावळत आहेत. पावसाच्या दोन सरी पडतील आणि पिकांना जीवदान मिळेल, या आशेवर शेतकरी दिवस काढत आहेत. मात्र पावसाचे संकेत कमी होत असल्याने आता शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. एकीकडे शेतीचा वाढलेला उत्पादन खर्च, दुसरीकडे पावसाची अनिश्चितता आणि हातातोंडाशी आलेल्या पिकांचे संकट, अशा तिहेरी कोंडीत शेतकरी सापडला आहे. पीक वाचविण्यासाठी अतिरिक्त खर्च करून पाणी देण्याचा प्रयत्न केला तरी प्रत्येक शेतकऱ्याकडे त्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध नाही.

### दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

तालुक्यातील पर्जन्यमान, पिकांची सद्यस्थिती, उपलब्ध जलसाठा आणि जमिनीतील ओलावा यांचा प्रशासनाने तातडीने आढावा घ्यावा. महसूल व कृषी विभागाच्या पथकांमार्फत गावनिहाय पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत. पिकांचे नुकसान लक्षात घेऊन दुष्काळ जाहीर करण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झाल्यास शेतकऱ्यांना शासनाच्या विविध सवलती, पीकविमा नुकसानभरपाई, आर्थिक मदत, वीज व पाणीपुरवठ्याबाबत आवश्यक उपाययोजना मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे निर्णय घेण्यास विलंब न करता प्रशासनाने जमिनीवरील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा वाढदिवस साजरा



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी बॅनरबाजी, हार-तुरे आणि सत्काराच्या कार्यक्रमांना फाटा देत सेवाभावी उपक्रमातून वाढदिवस साजरा केला. आमदार मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सचिन वायकर यांच्या नेतृत्वाखाली पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना फळे, बिस्किटे आणि पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचा आनंद केवळ कार्यकर्त्यांपुरता मर्यादित न ठेवता रुग्णांसोबत वाटण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

यावेळी सोमनाथ अकोलकर, नितीन एडके, नगरसेवक प्रतिक खेडकर, नगरसेवक अजिनाथ मोरे, पांडुरंग मरकड, अविनाश मंत्री, प्रशांत शेळके, बाळू खोर्दे, प्रसाद देशमुख, बाळराज काकडे, नरवणे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# द•ख•ल

## बुद्धिबळ स्पर्धेत कु.तृप्ती वायकर तालुक्यात प्रथम




**ढोरजळगाव :** शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धा डॉ. बाळासाहेब विखे पाटील स्कूल शेवगाव येथे उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत वै.श्रीम. ठकुबाई हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ढोरजळगाव ने येथील इयत्ता ९ वी ची कु. समृद्धी मारुती आव्हाड हिने सहभाग घेतला व इयत्ता १२ वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कु. तृप्ती संतोष वायकर हिने उत्कृष्ट बुद्धिबळ कौशल्याचे प्रदर्शन करत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. कु. तृप्ती वायकर हिची आता जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धे साठी निवड झाली आहे. तृप्तीच्या या यशाबद्दल तिचे त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड सुमतीताई साहेबराव घाडगे पाटील, उपाध्यक्षा ड स्नेहल घाडगे -चव्हाण पाटील, संस्थेच्या सहसचिव डॉ श्रुती घाडगे -आमले पाटील,विश्वस्त चेतन चव्हाण ,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ गौरव आमले पाटील तसेच ढोरजळगाव-ने संकुलाचे प्रशासक सचिन कर्डिले ,सिनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ.सुनिल चोळके, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ विनोद भोईटे ,त्रिमूर्ती पब्लिक स्कूलचे प्राचार्य संजय बुधवंत , विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता झिंजुर्डे , प्राचार्य आशिष भारती , क्रीडा प्रशिक्षक प्रशांत थोरात, दीपक कोठे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने तृप्तीचे अभिनंदन करण्यात आले आहे.

## गौरी आल्या माहेरी



**शिराळ चिचोंडी :** लाडक्या गणरायाच्या आगमनानंतर गुरुवारी घराघरात मांगल्य व कविता आणणाऱ्यागौरीचे सोन पावलानी उत्सव पूर्ण वातावरणात आगमन झाले गौराई चा तीन दिवसांचाहा उत्सव महिलांसाठी खास पर्वणी असतो यानिमित्त सासुर वासिनी माहेरीयेतात आगमनाच्या दिवशी गुरुवारी भाजी भाकरीचा नैवेद्य दाखविला जातो घरोघरी वेद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. गौरीपुढे आकर्षक सजावट हळदी कुंकू महिलांसाठी विविधस्पर्धा आदीकार्यक्रम उच्छाद साजरे करतात. शुक्रवारी गौरींना पंचपक्कानाचा नैवेद्य दाखविला जातो या दिवशी विविध फळे पदार्थाची मांडणी गौरीपुढे करण्यात येते या दिवशी सर्वत्र हळदीकुंकवाचा कार्यक्रमाचे आयोजन करतात. या रात्री गौरीची गाणी गायली जातात झिम्मा फुगडीची फेर धरले जातात,सुवासिनीचीनारळ आणि धान्याने ओटी भरली जाते घराघरात सुख शांती लावावी सौभाग्य दाभावी यासाठी गौरीची पार्थना करतात. शनिवारी तिसऱ्या दिवशी गौरीचे विसर्जन केले जाते यावेळीमहिला सुताच्यागाठी बांधतात ,सुवासिनी एकमेकीच्या ओटी भरतात त्यानंतर गौरीचे विसर्जन केले जाते.

## गौरीच्या आगमनाने कोरडगावात सोहळा

**कोरडगाव :** गणेशोत्सवाच्या उत्साहातच कोरडगाव येथे गौरीचे घरोघरी मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात आगमन झाले. गौरीच्या स्वागतासाठी महिलांनी पारंपरिक पद्धतीने जय्यत तयारी केली असून, घराघरांत सजावट, रांगोळ्या, फुलांची आरास आणि मंगलमय वातावरण पाहायला मिळत आहे. गौरी आगमनाच्या पार्श्वभूमीवर सकाळपासूनच महिलांची लगबग सुरू होती. घरांची स्वच्छता करून गौरीच्या स्वागतासाठी आकर्षक सजावट करण्यात आली. विविध रंगांच्या रांगोळ्या, फुलांच्या माळा, तोरणे तसेच आकर्षक विद्युत रोषणाईने अनेक घरे सजली होती. पारंपरिक पद्धतीने गौरीची स्थापना करून महिलांनी विधिवत पूजा-अर्चा आणि आरती केली. गौरीच्या आगमनानिमित्त घराघरांत विविध प्रकारचे नैवेद्य आणि पंचपक्वान्न तयार करण्यात आले. सुवासिनींनी गौरीची मनोभावे पूजा करून कुटुंबाच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि भरभराटीसाठी प्रार्थना केली. अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून गौरी उत्सवात सहभाग घेतला. गौरीच्या आगमनामुळे लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नातेवाईक, आप्तेष्ट आणि मित्रपरिवाराच्या भेटीगाठींना सुरुवात झाली असून, घराघरांत आनंदाचे वातावरण आहे. गौरी पूजनाच्या निमित्ताने महिलांकडून हळदी-कुंकू तसेच विविध पारंपरिक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.



---

# कर्जतमध्ये दुष्काळी उपाययोजनांसाठी शिवसेना आक्रमक!

## पाणीटंचाईग्रस्त गावांत टँकर, जनावरांसाठी चारा छावण्या

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** कर्जत तालुक्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने प्रशासनाकडे तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. शिवसेना कर्जत तालुकाप्रमुख डॉ. नितीन तोरडमल यांनी शेतकरी, पशुपालक आणि मजुरांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधत दुष्काळी उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी केली.

तालुक्यातील पाणीटंचाई सदृश परिस्थिती असलेल्या गावांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने दुष्काळग्रस्त सर्व गावांमध्ये तातडीने पाण्याचे टँकर सुरू करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून मदत द्या, पावसाअभावी नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळवून द्यावी, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. तसेच तालुक्यातील परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जनावरांसाठी चारा छावण्या अथवा चारा डेपो सुरू करा, दुष्काळाचा फटका केवळ शेतीला नव्हे तर पशुधनालाही बसत असल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वीच प्रशासनाने चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदानाची मागणी, दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने दुष्काळी अनुदान व शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा, अशी भूमिका शिवसेनेने मांडली आहे.

मजुरांच्या हाताला काम द्या!, पावसाअभावी शेतीची कामे ठप्प झाल्याने ग्रामीण भागातील मजुरांसमोर रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे रोहयोअंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे सुरू करून मजुरांच्या हाताला तातडीने काम उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दुष्काळाची परिस्थिती गंभीर होण्याची वाट न पाहता प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना सुरू कराव्यात. पाणी, चारा, रोजगार आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत या चारही आघाड्यांवर तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे, अशी भूमिका डॉ. नितीन तोरडमल यांनी मांडली. शेतकरी, पशुपालक आणि मजुरांना दिलासा मिळण्यासाठी प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी शिवसेना कर्जतच्या वतीने करण्यात आली आहे.

---

# रविवारी पारनेर शहरात १ कोटी २० लाखांच्या कामांचे भूमिपूजन : आ. दाते

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** पारनेर नगरपंचायत हद्दीतील नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या विविध रस्ते विकासकामांना आता सुरुवात होणार आहे. नगरपंचायत क्षेत्रातील नागरी सेवा व सुविधा कामे २०२५-२६ तसेच विशेष रस्ता अनुदान २०२५-२६ अंतर्गत आमदार दाते सर यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या एकूण १ कोटी २० लाख रुपयांच्या पाच विकासकामांचे भूमिपूजन रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता तिरकळ मळा, आ. काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी दिली.

यामध्ये वार्ड क्रमांक ५ अंतर्गत कान्हुर रोड ते सतीश वैद्य वस्ती रस्ता काँक्रिटीकरणासाठी २० लाख रुपये, कान्हुर रस्ता ते भाऊसाहेब पुजारी रस्ता काँक्रिटीकरणासाठी २० लाख रुपये आणि संगमेश्वर मंदिर ते पारनेरकर महाराज बाग रस्ता डांबरीकरणासाठी २० लाख रुपये अशा एकूण ६० लाख रुपयांच्या कामांचा समावेश आहे. तसेच वार्ड क्रमांक ५ अंतर्गत गोरख औटी ते पुणेवाडी पालखी मार्ग रस्ता काँक्रिटीकरणासाठी ४० लाख रुपये विशेष रस्ता अनुदानातून मंजूर झाले आहेत. नगरपंचायत क्षेत्रातील रस्ते, नागरी सुविधा आणि मूलभूत पायाभूत सुविधांच्या विकासाच्या दृष्टीने या कामांकडे पाहिले जात आहे. मंजूर निधीतून संबंधित रस्त्यांचे नियोजित पद्धतीने काँक्रिटीकरण व डांबरीकरण करण्यात येणार असून या कामांचा प्रत्यक्ष शुभारंभ कार्यक्रम रविवारी आयोजित करण्यात आला आहे. या भूमिपूजन कार्यक्रमास विजुभाऊ औटी, राजू औटी, सुनील गाडगे, कविता औटी, नगरसेवक अशोक चेडे, नगरसेवक युवराज पठारे, नगरसेवक भाऊ ठुबे, कांतीलाल ठाणगे, प्रदीप नगरे, माऊली औटी आदी मान्यवरांह महायुतीच्या घटक पक्षांचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करत पारनेर शहरातील नागरिकांनीही पारनेर शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या या ऐतीहासिक प्रसंगी उपस्थित राहून या विकासकामांच्या भूमिपूजन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# माझा शेतकरी जगला तरच बाजार समिती ऊर्जितावस्थेत येईल : खा. लंके




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** शेतकरी हा कृषी उत्पन्न बाजार समितीचा केंद्रबिंदू आहे. माझा कष्टकरी शेतकरी जगला तरच शेतकऱ्यांची कामधेनू असलेली पारनेर कृषी उत्पन्न बाजार समिती ऊर्जितावस्थेत येईल. त्यामुळे सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून एकमताने समितीच्या प्रगतीसाठी काम करावे, असे प्रतिपादन खासदार डॉ. निलेश लंके यांनी केले.पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर होते. यावेळी अशोक सावंत, तरटे, किसन सुपेकर, रा. या. औटी, अशोक कटारिया, मारुती रेपाळे, संदीप सालके, पद्मजा पठारे, पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, योगेश मते, अर्जुन भालेकर, दीपक लंके, भूषण शेलार,डॉ. श्रीकांत पठारे, विजय पवार आदी उपस्थित होते. प्रास्ताविक सभापती गंगाराम बेलकर यांनी केले. तर बाजार समितीचा वार्षिक अहवाल सचिव सुरेश आढाव यांनी सादर केला.

खा. लंके म्हणाले, बाजार समितीचा नावलौकिक वाढविण्याचे श्रेय व्यापारी, संचालक मंडळ, कर्मचारी आणि शेतकरी बांधवांना जाते. शेतकरी हाच आपला केंद्रबिंदू असून त्याच्याशी आपले नाते आहे. समितीला पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकविचाराने आणि पारदर्शक पद्धतीने निर्णय घेणे आवश्यक आहे.बाजार समितीच्या प्रगतीचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की, सन २०२३ मध्ये बाजार समिती तोट्यात होती. मात्र आज समिती सुमारे चार कोटी रुपयांच्या नफ्यात असून ३ कोटी ७२ लाख रुपयांच्या ठेवी आहेत.

---

# अपघात ग्रस्त वाहनाची नुकसान भरपाई वाहन मालकास देण्याचे आदेश

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने वाहन मालक अमोल भास्कर साखरे यांना अपघातामध्ये वाहनाच्या झालेल्या नुकसानी ची रक्कम रुपये एक लाख ५७ हजार रुपये तसेच त्यावर दिनांक २७ ९ १८ पासून रक्कम मिळेपर्यंत नऊ टक्के व्याज व तक्रारीच्या खर्चा ची रक्कम७००० व शारीरिक मानसिक व आर्थिक त्रासासाठी दहा हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी असे इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांना जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग अहिल्यानगर यांचे अध्यक्ष सादिक आली बशीर सय्यद व सदस्य चारू विनोद डोंगरे व श्रीमती संध्या श्रीपती कसबे यांनी पारित केलेले आहेत याबाबत सविस्तर वृत्त असे दिनांक १८ ८ २०१८ रोजी तक्रारदार अमोल साखरे त्यांच्या मालकीचे गाडी क्रमांक एम एच १६ बी वाय ०६०१ घेऊन येत असताना तिचा नगर मनमाड रोडवर अपघात झाला सदरील अपघात झाल्यानंतर त्यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे तक्रार केली होती त्याचा पंचनामा झालेला होता त्यानंतर वाहन दुरुस्तीसाठी संबंधित सर्विस स्टेशन येथे लावण्यात आलेले होते. असे कारण सांगून सदरचा विमा नाकारलेला होता त्याविरुद्ध सदरील अमोल भास्कर साखरे यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग अहिल्यानगर यांचेकडे ॲड. गोरक्ष पालवे यांचे मार्फत तक्रार दाखल केलेली होती सदरील तक्रारीची अंतिमतः गुणवत्तेवर सुनावणी होऊन जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने नुकताच न्याय निर्णय दिलेला आहे सदरील आदेशामध्ये इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांनी वाहनाचे नुकसानी ची रक्कम म्हणून एक लाख ५७ हजार रुपये तसेच सदरील रकमेवर २७ ९ २०१८ पासून रक्कम प्रत्यक्ष मिळेपर्यंत नऊ टक्के व्याज व शारीरिक मानसिक व आर्थिक त्रासासाठी दहा हजार रुपये व तक्रारीच्या खर्चा साठी सात हजार रुपये देण्याचे आदेश पारित केलेले आहेत तक्रारदार अमोल साखरे यांचे वतीने गोरक्ष पालवे यांनी युक्तिवाद केला त्यांना एडवोकेट गुरविंदर पंजाबी सागर गरजे रोहित बुधवंत राहुल दहिफळे विशाल वांढेकर धनश्री खेतमाळीस रोहित चांडवले विवेक बडे पुष्कराज बिडवाई प्रवीण निंबाळकर विवेकानंद बडे तेजस राख भक्ती तमनर बाळकृष्ण गीते यश केकान आश्विनी मोरे भालेराव अनिकेत आंधळे उत्कर्ष उगलमुगले यांनी सहाय्य केले.

---

# घरात समृध्दी बरोबरच मनात शांती आणि जीवनात सद्भावना असावी : साधना दीदी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** गणरायाच्या आगमनानंतर आता सर्वत्र ज्येष्ठ गौरींच्या आगमनाची भक्तिमय तयारी सुरू झाली आहे. पंचांगानुसार अनुराधा नक्षत्रात ज्येष्ठ गौरींचे आवाहन करण्याची परंपरा आहे. त्यानुसार पारनेर शहरातील योगशिक्षिका मिरा पुजारी यांच्या निवासस्थानी ज्येष्ठ गौरींचे आवाहन अत्यंत भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणात करण्यात आले. यावेळी ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी उपस्थित महिला भाविकांना ज्येष्ठ गौरी आवाहनाचे आध्यात्मिक महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सण आणि धार्मिक परंपरेमागे केवळ कर्मकांड नसून त्यामध्ये जीवनाला सकारात्मक दिशा देणारा आध्यात्मिक संदेश दडलेला आहे. ज्येष्ठ गौरींचे आवाहन म्हणजे घरामध्ये सुख, शांती, समृद्धी आणि सद्भावना यांचे स्वागत करण्याची सुंदर परंपरा आहे.घराची खरी समृद्धी ही केवळ भौतिक साधनांमध्ये नसून कुटुंबातील प्रेम, समाधान, संस्कार आणि परस्पर सन्मानात असते, असे साधना दिदी यांनी सांगितले. मनातील नकारात्मक विचार दूर करून शुद्ध, सकारात्मक आणि आनंदी विचारांचा स्वीकार केल्यास जीवनात आध्यात्मिक समृद्धी निर्माण होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.गौरीमातेचे स्वागत करताना प्रत्येकाने आपल्या अंतर्मनातील अहंकार, मत्सर, क्रोध आणि नकारात्मकता दूर करण्याचा संकल्प करावा. या प्रसंगी ज्येष्ठ गौरींची विधिवत पूजा, आवाहन व आरती करण्यात आली. महिलांनी पारंपरिक पद्धतीने गौरींचे स्वागत करून मंगलमय वातावरण निर्माण केले.

---

# बालसंगोपन योजनेच्या लाभार्थींची पडताळणी अकोलेतच करावी

## अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र शासनाच्या बालसंगोपन योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या एकल महिला व त्यांच्या मुलांची चौकशी व पडताळणी अहिल्यानगर येथे न करता अकोले येथेच करण्यात यावी, अशी मागणी श्री समर्थ सेवा ट्रस्ट अंतर्गत अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत समितीच्या अध्यक्षा रूपाली रेणुकदास यांच्या नेत्रृत्वाखाली अकोले तालुक्यातील एकल महिलां यांनी डॉ.पंकज आशिया जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना निवेदन दिले. यानंतर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी संजय कदम यांना कार्यवाहीचे निर्देश दिले.

अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समिती महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदात पुढे असे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या वतीने एकल महिलांच्या मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी राबविण्यात येणारी बालसंगोपन योजना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. मात्र, या योजनेच्या लाभार्थींची चौकशी व पडताळणी करण्यासाठी अकोले विधानसभा मतदारसंघातील एकल महिला व त्यांच्या मुलांना अहिल्यानगर येथे उपस्थित राहावे लागते. अकोले ते अहिल्यानगर हे अंतर सुमारे १३० किलोमीटर आहे. तर मतदारसंघातील घाटघर, बिताका, जाचकवाडी, कुमशेत, बारी आदी दुर्गम व आदिवासी भागातील गावांपासून अहिल्यानगरचे अंतर १७५ किलोमीटरपर्यंत आहे. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील एकल महिलांना या प्रक्रियेसाठी मोठा प्रवास करावा लागतो.

अनेक महिला रोजंदारी अथवा दैनंदिन कामावर अवलंबून असल्याने अहिल्यानगरला जाण्यासाठी त्यांना प्रवासाचा खर्च करावा लागतो. तसेच त्या दिवसाची रोजची मजुरीही बुडते. सकाळी लवकर घरातून निघून सायंकाळी पुन्हा घरी परतणे अनेक महिलांसाठी अडचणीचे ठरते. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे संबंधित बालसंगोपन समितीने लाभार्थी महिलांना अहिल्यानगर येथे न बोलावता अकोले येथे येऊनच लाभार्थी महिला व संबंधित व्यक्तींची चौकशी व पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे महिलांचा प्रवासाचा खर्च वाचेल, रोजंदारी बुडणार नाही आणि त्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागणार नाही. तसेच स्थानिक पातळीवर आवश्यक चौकशी व पडताळणी करणेही शक्य होईल. आदिवासी महिला व त्यांच्या कुटुंबांची परिस्थिती लक्षात घेऊन बालसंगोपन योजनेच्या लाभार्थींची पडताळणी अकोले येथेच घेण्याचे निर्देश संबंधित समितीला द्यावेत, अशी मागणी अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीच्या वतीने करण्यात आली आहे.



यावेळी छबाबाई डहाळे, योगिता बेनके, सविता जाधव, भारती धोंडबरे, गीता मेंगाळ, प्रियांका भोजने, जिजाबाई धाडवड, सुमित्रा भांगरे,नंदा सदगीर, रजिया शेख, कविता गावंडे , चंद्रकला पुंडे आदी एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दैनिक राष्ट्र सह्याद्री




# शिर्डी दूध डेअरीचे संस्थापक ज्ञानदेव गोंदकर यांचे निधन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिर्डी दूध डेअरीचे संस्थापक ज्ञानदेव निवृत्ती गोंदकर (वय ९२) त्यांचे वृद्धापकाळामुळे नुकतेच निधन झाले आहे. ते 'आबा' या नावानं सुपरिचित होते .ते शेतकरी व सधन कुटुंबातील असल्याने त्यांनी विविध व्यवसायांसोबतच सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रात मोठे कार्य केले. त्यांना आध्यात्मिक कामाची आवड असल्यामुळे ते प्रवचन व प्रबोधन करत असत.त्यांचे प्राथमिक शिक्षण शिर्डीत, माध्यमिक शिक्षण नाशिकमध्ये आणि महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे झाले असून त्यांनी बीए एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले होते. त्यांनी शिर्डी दूध डेअरीचे संस्थापक व संचालक तसेच भाजीपाला सोसायटीचे चेअरमनपद भूषवले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, पणतू आणि जावई असा मोठा परिवार आहे. त्यांचे सुपुत्र प्रमोद गोंदकर हे सामाजिक कार्यकर्ते, विनोद गोंदकर उद्योजक असून मुलींमध्ये कांचनताई मांढरे या जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या आणि मंगलताई सोमवंशी यांचा समावेश आहे.

# कारखाना व दूध संघ सर्वांची दिवाळी गोड करणार : थोरात

## सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कारखान्याची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : निळवंडे धरण व कालवे आपण पूर्ण केले असून, आता कालव्यांचे काँक्रिटीकरण करून पाणी पुढे नेले जात आहे. तालुक्याच्या समृद्धीसाठी पाणी आणि सुरळीत वीजपुरवठा अत्यंत महत्त्वाचा आहे. हक्काचे पाणी व नियमित वीज मिळविण्यासाठी सर्वांनी संघर्षासाठी तयार राहावे, असे आवाहन माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. यंदा साखर कारखाना आणि दूध संघ सर्वांची दिवाळी गोड करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत झाली. यावेळी थोरात बोलत होते. व्यासपीठावर माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, बाजीराव खेमनर, ड. माधवराव कानवडे, उपाध्यक्ष पांडुरंग पाटील घुले, दुर्गाताई तांबे, रणजीतसिंह देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांच्यासह संचालक, पदाधिकारी उपस्थित होते. बाळासाहेब थोरात म्हणाले, ८०० मेट्रिक टन गाळप क्षमतेपासून सुरू झालेल्या कारखान्याने ५९ वर्षांत विस्तारीकरणासह डिस्टलरी, इथेनॉल व वीज निर्मितीच्या क्षेत्रात यशस्वी वाटचाल केली आहे.

सभासदांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी उत्तरे दिली. सभेचे नोटीसवाचन त्यांनी केले, तर उपाध्यक्ष पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने सभासद, शेतकरी व ऊस उत्पादक उपस्थित होते. सर्वाधिक एकरी ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

# पोलीस ठाण्यातच खाकीचा राडा!

## अर्वाच्य शिवीगाळीनंतर धुमश्चक्री; कारवाईकडे लक्ष



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : शिस्त आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांमध्येच पोलीस ठाण्याच्या परिसरात धुमश्चक्री झाल्याची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. संभाजी गर्जे यांना संदीप राऊत, महादेव कोहक आणि एका खासगी इसमाने मारहाण केल्याची चर्चा असून, या घटनेबाबत अधिकृत तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधितांमध्ये प्रथम शाब्दिक वाद झाला. यावेळी अर्वाच्य शिवीगाळ झाल्यानंतर प्रकरण हातघाईवर गेले आणि एकमेकांना मारहाण झाल्याचे सांगितले जात आहे. पोलीस ठाण्याच्या परिसरातच हा प्रकार घडल्याने उपस्थितांमध्ये काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.या वादामागील नेमके कारण काय होते, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे घटनेच्या कारणाबाबत परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, या प्रकरणात संबंधितांवर पोलीस प्रशासनाकडून कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.शिस्तबद्ध खात्यातील कर्मचाऱ्यांमध्येच अशा प्रकारे वाद आणि मारहाण होणे हा प्रकार निंदनीय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी या घटनेची कशी दखल घेतात आणि चौकशीनंतर नेमकी कोणती कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

# पोलिसांना टीप दिल्याचा संशयावरून मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तु माझ्या भावाची पोलीसांना टिप दिली, असे म्हणुन आरोपींनी राहुल आघाव या तरुणाला शिवीगाळ, दमदाटी करुन फायटर, चॉपर व लाथा बूक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. तसेच हातपाय तोडण्याची धमकी दिली. ही घटना राहुरी तालुक्यातील बारागांव नांदुर येथे दि. १७ सप्टेंबर रोजी दुपारच्या दरम्यान घडली.राहुल पोपट आघाव, वय २३ वर्षे, हा तरुण राहुरी तालुक्यातील बारागांव नांदुर येथे कुटुंबासह राहत आहे. तसेच बुटा छबु पवार हा तेथेच राहत असुन त्याला केबल चोरीच्या गुन्ह्यात राहुरी पोलीसांनी अटक केलेली आहे. दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजे दरम्यान राहुल आघाव हा तरुण बारागांव नांदुर गावातील शिवनेरी पान स्टॉल टपरी समोर उभा होता. त्यावेळी तेथे आरोपी आले व म्हणाले कि, तु माझ्या भावाची पोलीसांना टिप दिली आहे. तेव्हा राहुल आघाव त्यांना समजावुन सांगत असताना आरोपींनी त्याला शिवीगाळ दमदाटी करत फायटर, चॉपर व लाथा बूक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. तसेच पुन्हा आमचे नादी लागला तर तुझे हातपाय काढु, अशी धमकी दिली. घटनेनंतर राहुल पोपट आघाव या तरुणाने राहुरी पोलिस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी परसराम छबु पवार व रोहीत अर्जुन बर्डे, दोघे रा. बारागांव नांदुर, ता. राहुरी, या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# दीपक पंडित यांना जातीवाचक शिवीगाळ, गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तु येथे काय करतो, तुझे काय काम आहे, असे म्हणून आरोपीने दिपक पंडीत यांना दमदाटी करून जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना राहुरी तालुक्यातील उंबरे येथे दि. १७ सप्टेंबर रोजी दुपारच्या वेळी घडली. दिपक वसंत पंडीत, (वय ३८ वर्षे), सरकारी ठेकेदार असून ते राहुरी तालुक्यातील उंबरे येथे राहत आहेत. दिपक पंडीत यांनी या पूर्वी उंबरे ग्रामपंचायतचा ठेका घेऊन कामे केली आहेत. त्या कामांची काही बिले ग्रामपंचायतकडे थकीत आहेत.

दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजे दरम्यान दिपक पंडीत हे उंबरे ग्रामपंचायतमध्ये गेले आणि ग्रामसेवक मुरलीधर रगड यांचे कॅबीनमध्ये बसले होते. त्यावेळी आरोपी तेथे आला आणि पंडीत यांना म्हणाला कि, तु येथे काय करतो, तुझे काय काम आहे, असे म्हणून त्याने पंडीत यांना दमदाटी करून जातीवाचक शिवीगाळ केली. दिपक वसंत पंडीत यांनी घटनेनंतर तात्काळ राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी अशोक दामोदर ढोकणे, रा. उंबरे, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा रजि. नं. १०६७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३५१ (२), ३५२ तसेच अनुसूचीत जाती आणि अनुसूचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३ (१) (आर), ३ (२) (व्हिए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास श्रीरामपूर येथील उप विभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर हे करीत आहे.

# अल्पवयीन मुलीची छेड; दोघांविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर** : नेवासा तालुक्यातील सोनई पोलिस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन केल्याच्या आरोपावरून दोन तरुणांविरुद्ध पोक्सोसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रणव बेल्हेकर व रोहित दरंदले (दोघेही रा. गणेशवाडी, ता. नेवासा) अशी आरोपींची नावे आहेत.

यापैकी एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, दुसरा फरार आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलीच्या घरासमोरून आरोपी वाहनावरून चक्कर मारत आवाज देऊन तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत होते. तसेच, 'तू मला आवडतेस,' असे म्हणत तिचा हात पकडून जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे मुलीला मानसिक त्रास झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, मुलीच्या भावाने आरोपींकडे याबाबत विचारणा केली असता त्याला लाकडी काठीने मारहाण करून शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी १७ सप्टेंबर रोजी सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह पोक्सो कायद्यातील कलम ८ व १२ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

घटनेनंतर पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव, पोलीस हवालदार पोपट आव्हाड व गणेश वाघमोडे यांनी घटनास्थळी पाहणी केली. पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले असून दुसऱ्याचा शोध सुरू आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव करीत आहेत.

# दार उघडताच वृद्ध महिलेवर हल्ला ५९ हजारांचा ऐवज लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : घराचा दरवाजा वाजवून 'मावशी दार उघडा' असे सांगत घरात प्रवेश केलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी वृद्ध महिलेच्या डोक्यावर टणक हत्याराने वार करून जखमी केले. त्यानंतर महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने व मोबाईल तसेच तिच्या बहिणीच्या मुलीचे सोन्याचे दागिने असा एकूण ५९ हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने काढून घेत चोरटे पसार झाले. ही घटना गोधेगाव येथे १७ सप्टेंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी मनूबाई पांडुरंग उंबरकर (वय ६५, रा. गोधेगाव) यांनी १८ सप्टेंबर रोजी नेवासा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार, रात्री सुमारे १०.४० वाजता घराचा दरवाजा वाजला. बाहेरून 'मावशी दार उघडा' असा आवाज आल्याने मनूबाई यांनी दरवाजा उघडला. त्यावेळी तोंडाला रुमाल बांधलेले तीन अनोळखी इसम घरात घुसले. त्यांनी मनूबाई यांना खाली पाडून टणक हत्याराने त्यांच्या डोक्यावर वार केले. यानंतर त्यांच्या गळ्यातील सोन्याचे डोरले, मणी व सॅमसंग मोबाईल तसेच स्वाती संदीप भणगे यांच्या गळ्यातील मणीमंगळसूत्र व कानातील कर्णफुले बळजबरीने काढून घेण्यात आली. चोरीनंतर तिघेही अंधाराचा फायदा घेत पसार झाले. घटनेत सुमारे पाच ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले, मणी व मोबाईल असा २३ हजारांचा, तर सुमारे पाच ग्रॅमचे मणीमंगळसूत्र व साडेतीन ग्रॅमची कर्णफुले असा ३६ हजारांचा ऐवज चोरीस गेला. जखमी मनूबाई यांच्यावर नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. नेवासा पोलिसांनी तीन अनोळखी चोरट्यांविरुद्ध गुन्ह्याची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

# दुधेश्वर गडावरील निसर्गरम्य छायाचित्र



संगमनेर तालुक्यातील औरंगपूर गोरक्षवाडी शनेश्वर गोरक्षनाथ यांच्या घराजवळ शनेश्वर पाझर तलाव आहे या तलावाजवळून दुधेश्वर गडाचे सोमनाथ डोळे यांनी अचूक छायाचित्र टिपले.

# जुन्या रस्त्याच्या वादातून मारहाण

## पाच जण गंभीर जखमी, दहा जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : जुन्या रस्त्याच्या वादाच्या कारणावरून शिवीगाळ व दमदाटी करून लाकडी काठी, दगड, कुऱ्हाड तसेच लाथाबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत पाच जण गंभीर जखमी झाल्याची घटना राहुरी तालुक्यातील तांभेरे येथे १६ सप्टेंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी दहा जणांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नानासाहेब पारुबाळ मुसमाडे (वय ६७, रा. तांभेरे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १६ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे १० वाजता ते काही व्यक्तींसमवेत गणपतीची आरती करून बसले होते.

त्यावेळी आरोपी तेथे आले. 'तुम्ही आमचा रस्ता का बंद केला,' असे म्हणत त्यांनी शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर जुन्या रस्त्याच्या वादातून लाकडी काठी, दगड व कुऱ्हाडीने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तसेच, 'डंपरखाली घालून मारून टाकू,' अशी धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याप्रकरणी शुभम शिवाजी मुसमाडे, ऋषिकेश लक्ष्मण मुसमाडे, अक्षय गोरक्ष मुसमाडे, शुभम गोरक्ष मुसमाडे, गोरक्ष रावसाहेब मुसमाडे, वैभव कैलास गागरे, गौरव कैलास गागरे, रोहित कचरू मुसमाडे (सर्व रा. तांभेरे), शुभम लहाणू सांगळे व संकेत खेडेकर (रा. तांदुळनेर) अशा दहा जणांविरुद्ध गुन्हा क्रमांक १०६५/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या मारहाणीत संजय दत्तात्रय मुसमाडे, पंढरीनाथ भानुदास मुसमाडे, आदित्य संजय मुसमाडे, शुभम पंढरीनाथ मुसमाडे व अभिजीत पंढरीनाथ मुसमाडे हे पाच जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# तोट्यातील पारनेर बाजार समिती चार कोटींच्या नफ्यात!

## शेतकरीहिताला प्राधान्य देण्याचे खा. लंके यांचे आवाहन




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खासदार नीलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सभापती गंगाराम बेलकर यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. बाजार समितीने आर्थिक प्रगती साधत सन २०२३ मधील तोट्याच्या स्थितीतून आज चार कोटी रुपयांच्या नफ्यात झेप घेतली असून राष्ट्रीयीकृत बँकेत ३ कोटी ७२ लाख रुपयांच्या ठेवी असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

खासदार नीलेश लंके म्हणाले, बाजार समितीचा कारभार शेतकरी केंद्रित असला पाहिजे. शेतकरी जगला तरच बाजार समिती उर्जितावस्थेत येईल. त्यामुळे संचालक मंडळाने एकमताने निर्णय घेत शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा कशा देता येतील, याचा विचार करावा. बाजार समितीच्या प्रगतीचे श्रेय व्यापारी, संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाला असल्याचेही त्यांनी सांगितले. बाजार समितीच्या जडणघडणीत योगदान देणारे दिवंगत व्यापारी पांडुरंग काळे तसेच मारुती रेपाळे, नंदकुमार देशमुख, राजेंद्र तारडे यांच्यासह अन्य व्यापाऱ्यांच्या योगदानाचा खासदार लंके यांनी गौरव केला. भाळवणी येथे उपबाजार सुरू करण्यात आला असून टाकळी ढोकेश्वर येथेही उपबाजार सुरू करण्यासाठी सरपंच बाळासाहेब खिलारी यांनी जागा उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी माजी सभापती बाबाजी तरटे, किसन रासकर, किसन सुपेकर, रा या औटी, बापूसाहेब शिर्के, शिवाजीशेठ बेलकर, अशोक सावंत, विजय पवार, अशोक कटारिया, मारुती रेपाळे, संदीप सालके, चंदन भळगट, पद्मजा पठारे, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, डॉ. श्रीकांत पठारे, योगेश मते, अर्जुन भालेकर, दीपक लंके, धोंडीभाऊ पुजारी, तुकाराम चव्हाण, भूषण शेलार यांच्यासह संचालक, व्यापारी, शेतकरी व मान्यवर उपस्थित होते. सभापती गंगाराम बेलकर यांनी प्रास्ताविक केले.

सचिव सुरेश आढाव यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. मोहन रोकडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी बाजार समितीच्या वतीने आदर्श शेतकरी तसेच विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

# कुख्यात विजय पठारेसह पाच जणांविरुद्ध मोक्कान्वये दोषारोपपत्र

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यातील कुख्यात आरोपी विजय राजू पठारे, अजय राजू पठारे यांच्यासह पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अन्वये २२४ पानी पुरवणी दोषारोपपत्र १७ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर येथील विशेष मोक्का न्यायालयात दाखल करण्यात आले. या कारवाईमुळे सराईत गुन्हेगारांवर पोलिसांनी मोक्का कायद्याचा बडगा उगारला आहे. विजय राजू पठारे, अजय राजू पठारे, किरण मोहन जेधिया, सनी रंजीत चावरे आणि निलेश बाबासाहेब ससाने (सर्व रा. सिद्धार्थनगर, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध १५ मार्च २०२६ रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात आर्म्स क्टअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, या गुन्ह्यातील आरोपी सराईत गुन्हेगार असून, त्यांच्याविरुद्ध तोफखाना, कोतवाली आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांत शरीराविरुद्ध तसेच मालमत्तेविरुद्ध विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी संघटितपणे गुन्हेगारी कृत्य केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने संबंधित गुन्ह्यात मोक्का कायद्याची कलमे वाढविण्याबाबतचा प्रस्ताव नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे सादर करण्यात आला होता. मंजुरी मिळाल्यानंतर या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांनी केला.

तपासादरम्यान आरोपींविरुद्धचे पूर्वीचे गुन्हे, संघटित गुन्हेगारीशी संबंधित बाबी तसेच उपलब्ध पुरावे संकलित करण्यात आले. त्यानुसार मोक्का कलमांन्वये पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक कार्यालयाकडे मंजुरीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. या प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर १७ सप्टेंबर रोजी विशेष मोक्का न्यायालयात २२४ पानी पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

# कोयत्याचा धाक दाखवून शेतकऱ्याची मोटार, केबल लंपास, राहुरी पोलिसांकडून आरोपी जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शेतकऱ्याला कोयत्याचा धाक दाखवून विहिरीतील पाण्याची मोटार व केबल जबरदस्तीने घेऊन गेल्याची घटना राहुरी तालुक्यातील टाकळीमियाँ येथे १३ सप्टेंबर रोजी पहाटे घडली. याप्रकरणी राहुरी पोलिसांनी आरोपींना मुद्देमालासह जेरबंद केले असून, चोरीच्या तीन इलेक्ट्रिक मोटारी व केबल जप्त करण्यात आल्या आहेत. अनिकेत जगन्नाथ सगळगिळे (वय ३३, व्यवसाय शेती, रा. टाकळीमियाँ) हे १३ सप्टेंबर रोजी पहाटे चार वाजता शेतातील ऊस पिकाला दिलेले पाणी पाहण्यासाठी गेले होते. त्यानंतर विहिरीकडे गेले असता त्यांना गावातील चार आरोपी दिसले. आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवत आरडाओरड केल्यास 'तुझे तुकडे करून टाकू,' अशी धमकी दिली. त्यानंतर विहिरीतील पाण्याची मोटार व केबल काढून जबरदस्तीने घेऊन गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दुसऱ्या दिवशी अजय उर्फ काळ्या बाबुलाल जाधव हा मियाँसाहेब दर्या परिसरातील चौकात दिसल्यानंतर सगळगिळे यांनी पोलिसांना माहिती दिली. ग्रामस्थांनी जाधव याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. चौकशीत त्याने दादा निकम, सचिन सोनवणे व बॉक्सर यांच्यासह मोटार व केबल चोरी करून रमेश जालिंदर गोसावी याला विकल्याची माहिती दिली. त्यानंतर रमेश गोसावी व बॉक्सर उर्फ सिकंदर दगडू शेख यांना पोलिसांनी अटक केली. तसेच अन्य ठिकाणांहून चोरी केलेल्या दोन इलेक्ट्रिक मोटारी व केबलही जप्त करण्यात आल्या. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव व पोलीस नाईक गणेश लिपणे करीत आहेत. पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने ही कारवाई केली.


